# उदय

(जीवनपर कवितासंग्रह - भाग ३)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**उदय** (जीवनपर कवितासंग्रह - भाग ३)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : माघ कृ. १२, शके १९४५,
गुरुवार, दि. ७ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-971022-0-2

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

# समर्पण




जीवनाचा अर्थ समजावून सांगताना
जीवनाला अर्थ देणाऱ्या माझ्या सर्व गुरुजनांना
हा जीवनपर कवितासंग्रह
सदार सविनय
समर्पित

# मनोगत

जन्म व मृत्यूच्या मधल्या कालावधीला जीवन म्हणतात. हा कालावधी अनिश्चित असतो. माणसे श्वास घेतात हे खरे पण जगतात का? हा प्रश्नच असतो. मुळात जीवनाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन अतिशय वेगवेगळा असतो अथवा कधी कधी तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच विकसित झालेली नसते.

कविमनाने जगण्याच्या प्रत्येक पैलूवर मन विसावते तेव्हा जीवनपर कविता उतरत जातात. हा दृष्टिकोन जरी कवयित्री म्हणून माझा असला तरी तो रसिकहृदयाचा ठाव घेणारा असल्याने त्याचेच जीवन उलगडवणारा ठरतो.

जीवन म्हणजे तर सोपे, म्हटले तर अवघड, केवळ त्याला जगताना मनात एक उमेद जिवंत हवी, कुणाचा स्नेह, कुणाचे वात्सल्य, कुणाची ओढ हृदयात हवी. भोवतालच्या प्रत्येक बाबीत जीवन जर गवसू लागले तर मग त्याचा नव्याने शोध घेण्याची गरजच पडत नाही.

रसिकांना या जीवनपर कविता जीवनासाठी हव्या हव्याशा वाटतील, तरच या सफल होतील.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) दार अभंग घराचे ... ७
२) सद्कर्माच्या लहरी निरंतर ... ८
३) एक सरोवर आपुले ऐसे... ९
४) क्षण मौलिक हे सावरती... १०
५) मोकळे आकाश सारे ... ११
६) प्रकाश होऊ द्यावे दैव ... १२
७) पायरी ... १३
८) तेजवारसा निथळू दे ... १४
९) गहन बापुडे कोडे ... १५
१०) प्रेम लाभता अमूल्य ... १६
११) उजळले चेहरे ... १७
१२) बिन भिंतींची शाळा ... १८
१३) कार्य ... १९
१४) आयुष्य ... २०
१५) यत्न ... २१
१६) मनाचे किनारेऽऽऽ ... २२
१७) ओल आगळ्या स्मृतींची ... २३
१८) जीव कुठेच नको तो जडणं ... २४
१९) सुगंध आजचा हुंगावा ... २५
२०) आत्मविश्वासे जग जिंकते ... २६
२१) लाडू ... २७
२२) हृदयाकाशी प्रकाश ... २८
२३) तुझ्या सांडण्याला नको भेदभाव ... २९
२४) हे केवढं मोठं भाग्य असतं ... ३०
२५) असे सूर जुळले काही ... ३१
२६) नितांत जगणे न्यारे ... ३२
२७) जिवाभावाचं गोंदण ... ३३
२८) मैत्र वैश्विक भावना ... ३४
२९) मोजदाद ही कशाला ... ३५
३०) प्रश्न नाचती ... ३६
३१) मन कुणाला कळे रे ... ३७
३२) मोकळे तुज आकाश ... ३८
३३) रत्ने लावण्याची ... ३९
३४) चल जाऊ तिथे ... ४०
३५) रांगोळी ... ४१
३६) ओजसाचा धरू कर ... ४२
३७) अन्नापुढे नाही कुणी ... ४३
३८) अजब असे भोवरा ... ४४
३९) फुलतो शहारा ... ४५
४०) सुखे दिसावा पैलतीर मज ... ४६
४१) कसा कळावा थांग मनाचा ... ४७
४२) बाजार मांडलाय देवाच्या दारी ... ४८
४३) उतारवय ... ४९
४४) कळते ना गणित कोणा... ५०
४५) आजारापेक्षा उपाय गंभीर ... ५१
४६) जगण्याचे सारांश येथले... ५२
४७) हवेहवेसे वाटते जीवन ... ५३
४८) तीर खुणा मज जपतो ... ५४

४९) लागे किनारी नाव ... ५५
५०) झाड मानवी सुकू न द्यावे ... ५६
५१) पाचोळा जन्मा आला ... ५७
५२) घर माझे ... ५८
५३) सुहास्य माझे ठेवणीतले... ५९
५४) चित्त रमावे
शृंगार दालनी ... ६०
५५) झोप सुखाची ... ६१
५६) प्रीत उधाण उराशी ... ६२
५७) तेजाची खाण हाती ... ६३
५८) मातीमधल्या या खुणा ... ६४
५९) खरे सुख ... ६५
६०) प्रवास ... ६६
६१) आठवणींना फुटले पाय... ६७
६२) दोन धुक्यांनी ... ... ६८
६३) परमेशाचे देणे सुंदर ... ६९
६४) ऐक एवढे बोल मैत्रीचे ... ७०
६५) मन सुंदर तर
विश्वची सुंदर ... ७१
६६) मुठीत काळाला धरलं ... ७२
६७) सुंदर असते मन रुपडे ... ७३
६८) सुख सांजवात ... ७४
६९) चाले आता शोध
माझाच कोण मी ... ७५
७०) मनातून उमटून
येती तराणे ... ७६
७१) प्रेम लाभताच स्वर्ग ... ७७
७२) वसा कुंभाराचा घ्यावा ... ७८
७३) मृद्गंध मोहवी मना ... ८०
७४) वसा जांभळा मी घ्यावा... ८१
७५) वाटा एकल्या चालाव्या... ८२
७६) या कमानीची
खुमारी आठवावी ... ८३
७७) साधना ही
पंचप्राणा जागवीण्या ... ८४
७८) नवी खुमारी नव्या नव्याने... ८५
७९) सुंदर जगणे असे घडावे... ८६
८०) याच सुखाच्या
मोहक व्याख्या ... ८७
८१) मनास रमू दे ग्रंथांमध्ये ... ८८
८२) जात राहणे जीवन ... ८९
८३) विधात्याची जणू
आस असे ... ९०
८४) ‘आई’ शब्द हे ... ९१
८५) मग नवीनतम मंजूषा ... ९२
८६) नाते कोणते
कोणत्या खुणा ... ९३
८७) लळा जिव्हाळा
स्पर्श बोलती ... ९४
८८) एवढाच मज वर दे ... ९५
८९) तो काळ ठप्प झाला ... ९६
९०) नवी वादळे ... ९७
९१) माझ्या कवितेची गोडी ... ९८
९२) अहा बाहेरी ती वनराई... ९९
९३) त्याचे रूप आठवावे ... १००
९४) भरल्या आभाळाची व्यथा... १०१
९५) ती धनिक खरी सुंदरी ... १०२
९६) मनास उंचावरून झोकता ... १०३

## (१)
## दार अभंग घराचे

या दाराशी
घर हे माझे
अजून रेंगाळते

मनास माझ्या
इथेच अजुनी
माया सारी मिळते

जरी विटांचे
जुने मोडके
घर अजूनही उभे

तेच जाणते
बालपणीचे
अवखळ मज मनसुभे

रम्य खेळले
बाळ पसारे
इथेच मनमोराचे

किती वादळे
झेलून खंबीर
उभे दार जोराचे

सुखदुःखाचे
साथी होते
दार अभंग घराचे

ऊर दाटुनी
येतो माझा
गाभुळ नभ गारांचे

दि. १७/०९/२१
रात्री १०.३४ वा.

## (२)
## सद्कर्माच्या लहरी निरंतर

इहलोकातून परलोकाकडे
जणू सहज चालणे
खुणा पदांच्या वाळूमध्ये
अस्तित्वा बोलणे

माहीत असते जरीही मिटतील
चिन्हे माझी इथली
तरी चालणे का थांबावे
ओढ असावी तिथली

जगण्यामधल्या रीतिभाती
कधी जरा विसराव्या
अथांग सागर खळखळ लाटा
हृदयांतरी पसराव्या

त्याला असते का कधी खंत
येई किनाऱ्या कोणी
तो त्याच्या त्या मस्तीमध्ये
उडवीत जातो पाणी

ओले इथले क्षणभर जगणे
ओलसर आठवणी
सुकवील कोणी म्हणून आज का
आनंदा पाठवणी

गाज ऐकुनी वेळोवेळी
त्याच्या चैतन्याची
स्फूर्ती चढते सदैव काही
नियमितपणे करण्याची

कशास पर्वा कशास चिंता
का मी असे कुढावे
सद्कर्माच्या लहरी निरंतर
चित्र रम्य काढावे

दि. २३/१०/२१
सकाळी ०८.५३ वा.

## (३)
## एक सरोवर आपुले ऐसे

हंस विहरती सरोवरातून
धुंद धुंदी मनी पसरे
चित्र देखणे अनुभवून मग
जग वाटते सारे हसरे

डोंगर फुलला घरकुलांच्या
उमलत्या हसऱ्या कळ्यांनी
बहरून गेल्या पर्वतावरी
मन उमले स्वप्नांनी

झाडे वेली सजवून जाती
क्षण मन घर हे सारे
धुंदीमध्ये गंध वाहती
इथले सुरभित वारे

एक किनारा लाभतो ऐसा
वेळ किती स्मरणीय
श्वासासंगे गुंफून जातील
किती जन्म रमणीय

विसरून सारे कुशीत ऐसे
निसर्गाच्या मन रमते
कितीही वेळा जावे जवळी
ते मुळीच ना दमते

मनमोराचा कधी होतसे
डौलदार राजहंस
रंग विसरूनी लौकिक सारे
शुभ्र पसरे मनी अंश

एक सरोवर आपुले ऐसे
त्यात विहरते काया
आत्मरूपाच्या प्रतिबिंबाने
जन्म सफल व्हावया

दि. १०/१०/२१
सकाळी ०९.२६ वा.

## (४)
## क्षण मौलिक हे सावरती

अशी सुखाची घेऊन लोळी
गर्भरेशमी तृणावरी
फुलाफुलांच्या नक्षीदार या
सुंदर गालीचाच्या वरी

जगातले सर्वात सुखी मग
श्रीमंतही आपणचि असू
मनात होती गुदगुल्या सदा
हवेत मनीचे उडते हसू

खुशाल द्यावे हातपाय पसरून
चिंता सोडल्या कुठेतरी
निळ्या नभाच्या छत्राखाली
नजर उंच त्या उडण्यावरी

किती हिरवाई भासे गोंडस
स्पर्श मल्मली खुणावती
नि:श्वासातून मिळे दिलासा
आकांक्षा ही दुनावती

शरीर असू दे मानवाचे वा
माझ्यासम प्राणीच कुणी
निवांत ऐसे पहुडणे हे
विश्रांती किती बहुगुणी

रोजरोजचे तणाव जाळती
आयुष्याला पोखरती
जावे ऐसे निवांत जगण्या
क्षण मौलिक हे सावरती

दि. १३/१०/२१
दुपारी ०३.५६ वा.

## (५)
## मोकळे आकाश सारे

मोकळे आकाश सारे
तेज लेऊन चालले
चंद्रसूर्याच्या गतीला
किरण मार्गही दाविले

रंग त्याचे शुभ्र अभ्रे
पांढरे निळे गोजिरे
उगवतीचे रंग सुंदर
मावळतीला साजिरे

होई उधळण वर्ण संपद
कुंचल्याची कुसर ही
दिसतो ना कधी चित्रकार तो
फलक नभ सकारही

ते ढगांचे गुच्छ वेडे
कधी रिकामे कधी जलद
चालताना त्या नभातून
स्वप्नं फिके तर कधी गडद

कधी उमटते इंद्रधनुचे
रंगारंगी तोरण
कधी गरजती मेघ नुसते
वर्षावाचे ना धोरण

आभाळ भरते ते कधी
ढग काळेकुट्ट हे जमती दाट
पावसाची राणी झरते
पहावा सृष्टीचा तो थाट

बरसुनी कर मोकळे हे
अंतरातील तुज आभाळ
आकाशाच्या पोकळीतून
उगवूनी ये नव सकाळ

दि. १४/१०/२१
सकाळी ०९.१५ वा.

## (६)
## प्रकाश होऊ द्यावे दैव

सूर्यफूल मज होता यावे
मी तेजाशी मुख मिळवावे
मागे मागे तेजा पाठी
तेजाचे मी गाणे गावे

आराधना मज चालो निरंतर
पडो ना त्यातून काही अंतर
कसला तम हा तमा ना त्याची
तेजासाठी मुख स्थित्यंतर

अंगावरती लेऊन पहावे
चमचम ऐसे सोने न्यारे
सोनसळी ती तिरीप उन्हाची
पोसून उदरी बीजा घ्यारे

आत पोसू द्या स्नेह ओलावा
तरारून या येतील बीया
आरोग्याचा मंत्र जपुनी
दिवा जळो वा पोसो काया

डोल डोलूनी जगणे व्हावे
हास हासुनी खळखळ जावे
मळभ दुःखाचे सावट सोडून
तेजाच्या किरणातून न्हावे

सूर्यफुलासम फुलणे सदैव
सूर्यासंगे झुलणे सदैव
कुण्या अंधारा घाला पाठी
प्रकाश होऊ द्यावे दैव

दि. २४/०८/२१
पहाटे ०५.४६ वा.

## (७)
## पायरी

वर वर चढण्या
हव्या पायऱ्या
उतरून येण्यासही

जरा विसावा
जरा दिलासा
मनास देण्यासही

दमवून जाती
कधी चढ्या या
दम वाढवण्यासही

दमा दमाने
हलके हलके
ताण उतरण्यासही

सोपानांची
उन्नत अवली
जीव रमवण्यासही

कधी कुणाच्या
संगे थोडे
थांबून जाण्यासही

कशास चिंता
चढू पायरी
गड जिंकण्यासही

उंचावरूनी
पाहू विहंगम
धरा सुंदरा खरी

यश शिखरांवर
करू चढाई
वंदुनिया पायरी

कितीही गेलो
उन्नत स्थानी
विसरू ना .. 'पहिली पायरी'

दि. २०/०९/२१
सकाळी ०८.०२ वा.

## (८)
## तेजवारसा निथळू दे

प्रकाशवाटा शोधत जाईन
तेज सूर्याचे लपेल का
किती झाकोळून टाकले मेघे
किरण शलाका दबेल का

भरून येऊ दे अंधाराचे
एकवटून किती जाळे
सावरून मी त्या प्रलयाला
दशदिशांना हो उजळे

एकच होतील असुर सारे
मिळून भिडतील डुबविण्या
एक मार्ग कुणी बंद केला तर
वाटा मोकळ्या किती मना

आतून माझ्या प्रकाश वाहे
कांती माझा देह असा
विचार माझे अंगाराचे
चिंतन धगधगणारा वसा

शीतल जळ हा माझा विसावा
त्यासी भेटण्या जाईन मी
तेथून ऊर्जा पुन्हा मिळवुनी
पुन्हा तयाला देईन मी

जाणकार बघ असतील तेथे
प्रतिभेच्या आभेसाठी
कुणी डावलले तरी न खेद मज
रत्नपारखी मज गाठी

सेवा घडू दे प्रकाशण्याची
तेजवारसा निथळू दे
अंधाराचे पहाड कभिन्न
प्रभेने माझ्या वितळू दे

दि. २१/०९/२१
सकाळी ११.२१ वा.

## (९)
## गहन बापुडे कोडे

निळ्याशार सागरात बेटे
सुखे विसावलेली
अथांग सागर अनंत नभ हे
निळाई पसरलेली

बेटांवरती पाचूसम ही
नटलेली हिरवाई
मंद मंदशी वाहत येते
झुळूक थंड थंडाई

वरून पाहता जळावरी जणू
मांडियली रांगोळी
आकार नाही उकार त्यांना
तरीही मोहविते भारी

कधी वाटते फुलले गुच्छ कुणी
अंथरले पाण्यावर
रत्नाकराचे अभिनंदन जणू
बेटाबेटांवर

समुद्र सारा खारा खारा
गोड झरे पाझरती
सृष्टीच्या पालनास दक्ष
ईश कार्ये चालती

असे बेट मज कधी खुणावे
निवांत राहण्या थोडे
आपसुक उकलून येतील मग हे
गहन बापुडे कोडे

दि. ०६/१०/२१
सकाळी १०.२२ वा.

## (१०)
## प्रेम लाभता अमूल्य

जीव एकला एकला
आईविना जो धाकला
सारं सांभाळून रोज
जीव दमला थकला

नाही कोणी मनापाशी
मन उदास पोरके
बाप राहे आता जवळी
परी जुळती ना धागे

जीव एकटा अनाथ
मन शोधतं निवारा
प्राणिजगतात त्याने
एक शोधला किनारा

अंडी बदकाची आली
घरी चाहूल सुखाची
उबवून पिल्लं सारी
गोड गोड बदकाची

जीव प्रेमाचा भुकेला
माय पिलांची हो झाला
जीव रमला चांगला
जीव जडला जडला

परी जग त्यांचे त्यांना
देण्या धडपड झाली
आकाशात तीही मग
एक पक्षी होत गेली

जीव विसावला आता
प्रेम गाठीशी बांधलं
प्राणी जवळ येऊन
नातं अतूट सांधलं

प्रेम निरपेक्ष असं
साऱ्या जगतास हवं
प्रेम लाभता अमूल्य
जगणं हे नवं नवं

दि. ०८/१०/२१
सकाळी ०८.५७ वा.

## (११)
## उजळले चेहरे

उसाचे कांडे फडक्यात बांधले
सोलून रसाच्या रसा
दारिद्र्य पुजलंय पाचवीला जरीही
रानात पार्टीला बसा

कुठून मिळणार पिझ्झा न केक सारं
आईस्क्रीम दुरूनच पाहणार
गावरान मेव्याच्या संगतीनं पोरं हे
खुशीत उसाळे खाणार

नाकाला शेंबडाची धार
अन् कपड्यांना धुळीचा मार
डोळ्यात खुशीची धार
ह्या पोरांची अजब खुमार

आजच्या भुकेची काळजी घ्यावी
राबराब राबून शिदोरी आणावी
दगडांची चूल रानवाऱ्याची भूल
तोंडात घास तवा कष्ट वसूल

लेकरांच्या गाठीला गरिबी कण्या
उद्याचं काय होईल माहीत कुणा
आनंदासाठी हो कशाला मना
उजळले चेहरे झोपडीत पहा ना

दि. ११/०१/२२
रात्री ०८.२२ वा.

## (१२)
## **बिन भिंतींची शाळा**

बिन भिंतींची शाळा
असीम इथले खडू फळा
अगणित गुरुजन ज्ञानी पहा
ज्ञानसत्र चालले अहा
असंख्य इथल्या वेळा
बिन भिंतींची शाळा

छात्र तुम्हाला होता यावे
कणकण ज्ञाना घेता यावे
विलया मीपण नेता यावे
क्षणा क्षणाचे गुरुकुल व्हावे
असा जमे मग मेळा
बिन भिंतींची शाळा

तेज देणे घ्या शिकून सहजी
चंद्र सूर्याची कर्तव्ये जी
नदी झऱ्याच्या झुळझुळ धारा
सळसळ पाने शीतल वारा
निसर्ग करतो रोज सोहळा
बिन भिंतींची शाळा

कुणी पशु मग साठवतो का
धान्य संपदा पाठवतो का
रोज जेवढे हवे ते घेणे
असेच जगणे समजून घेणे
नको धनाच्या नाना कळा
बिन भिंतींची शाळा

उंच उडती ही इवली पाखरे
पंखांमध्ये बळ केवढे
पुन्हा येती फिरूनिया घरटी ते
सांज घराला घरपण देते
चिवचिव आनंदाचा गळा
बिन भिंतींची शाळा

अध्यात्माचे हेच सांगणे
कोऽहम् पासून ब्रह्म जाणणे
तत्त्वमसि हे कळून येता
अहं ब्रह्मास्मि तेथ पोचणे
गहन ज्ञानाचा मार्ग भला
बिन भिंतींची शाळा
बिन भिंतींची शाळा

दि. ०५/०४/२०२२
सकाळी ०९.३२ वा.

## (१३)
## कार्य

कार्य म्हणजे कृती आपुली
सत्कर्माची गती चांगली
कुकर्म घडता फळही तैसे
कर्माचे हे संचित ऐसे

कार्य सुरू ते जन्मापासून
कळता न कळता जातो व्यापून
कार्य साथीला जन्मभरी ते
कार्यासाठी इच्छा आतून

माणूस गणला जातो त्याच्या
हातून घडल्या कार्यामधुनी
कार्य आरसा असते त्याच्या
वैचारिक मर्माचा आतुनी

कार्य करावे कर्तव्याचे
म्हणून गीता बोधन पार्था
भगवंताने कार्यासाठी
अवतरून केले परमार्था

कार्य शुभाशुभ दोन्ही असते
मंगल कार्या जमतील सारे
कार्य अमंगळ करणे जेव्हा
एकटाही कुणी त्यास पुरे रे

कार्यासाठी झटला कोणी
कार्यासाठी झिजला कोणी
कार्य साधण्या स्वार्थी कोणी
कार्यास्तव दे प्राणही कोणी

कार्याचीच प्रशंसा होते
पारितोषिके बहाल होती
कार्याचीच चिडून विटंबना
कार्याने मानापमान ही

माणूस उरतो कार्यरूपाने
माणूस ठरतो कार्य करण्याने
कार्यकरणाने जगताचे मग
संचालन हे नित्यनव्याने

कार्याने यश अपयश पदरी
कार्य घास घाली तो उदरी
कार्य अर्थपूर्णताही देते
कार्य दिगंती कीर्ती नेते

म्हणून सावध सदैव रहावे
कार्य अती निष्ठेने व्हावे
अंतिम कार्य फळेल तेव्हा
कार्यापुढती नतमस्तक व्हावे

कार्य साथीला जन्माआधी
कार्य सोबती मृत्यूनंतर
सृष्टी सारी कार्या तत्पर
कार्यची करणे नित्यनिरंतर

घे कार्याचा ध्यास तू वेड्या
सत्कर्माने खुलतील बेड्या
कार्यावरती कोर आपुले
नाव अलौकिक गंधित पेढ्या

दि. १०/०५/२१
दुपारी ०१.५७ वा.

## (१४)
## आयुष्य

सरते सरते सरते आयुष्य
सहजी सरते सरते सरते आयुष्य
झुरते झुरते झुरते आयुष्य
खूपदा झुरते झुरते झुरते आयुष्य

करते करते करते आयुष्य
सोबत करते करते करते आयुष्य
झरते झरते झरते आयुष्य
काळ चाळणीतून झरते आयुष्य

मरते मरते मरते आयुष्य
कुणी न आपुले उरता मरते आयुष्य
ठरते सुंदर ठरते आयुष्य
मनासारखे कुणी भेटता सुंदर आयुष्य

पुरते पुरते पुरते आयुष्य
क्षणाक्षणाला जगताना मग पुरते आयुष्य
भरते भरते भरते आयुष्य
कर्मओंजळी भरते आयुष्य

कुरकुर करता कुरकुरते आयुष्य
आनंदाची पखरण करता स्फुरते आयुष्य
जगून घ्यावे भरभरून भरभरून आयुष्य
देहाविणही सत्कर्माने उरते आयुष्य

दि. ०१/०४/२०२२
सकाळी १०.१३ वा.

## (१५)
## यत्न

यत्न यशाचे गमक,
यत्न दाखवी धमक !
यत्न कर्माची चमक,
यत्न सदा आचरावा !!

यत्न आशेचा की मार्ग,
यत्न सदाचे सत्कार्य !
यत्न सखा नीट धैर्य,
यत्न सदा सांभाळावा !!

यत्न समाधान देई,
यत्न साफल्याची आई !
यत्न नियोजन योग्य,
यत्न यत्नेचि करावा !!

यत्न चित्र भविष्याचे,
आलेख आयुष्याचे !
यत्न जीवन तोषण्याचे,
यत्नमय जीव व्हावा !!

यत्न आवडती देवा,
साथ जात राही दैवा !
यत्ने संतोषाचा मेवा,
यत्न निधी साठवावा !!

दि. ११/०४/२०२२
सकाळी ११.११ वा.

## (१६)
## मनाचे किनारेऽऽऽ

मनाचे किनारे
मना पाहणारे
सदा सोबतीने
असे चालणारे

मनाचे किनारे
सुखा भावणारे
हळुवार ऐसी
झुळुक पावणारे

मनाचे किनारे
कधी भोगणारे
दुःखास विलया
नेऊ पाहणारे

मनाचे किनारे
कधी ते बिचारे
मनालाच वेडे
उगा बोचणारे

मनाचे किनारे
जिवा सांगणारे
गुपित बोलके
बोलुनी साधणारे

मनाचे किनारे
उगा शांत का रे
किती साठवूनी
निवांत ते का रे

मनाचे किनारे
दिलासा देणारे
लाटा उसळत्या
व्यथा झेलणारे

मनाचे किनारे
मना पाहणारे
सर्वस्व आपुले
मना वाहणारे
मनाचे किनारेऽऽऽ

दि. १३/०४/२०२२
सकाळी ०९.३२ वा.

## (१७)
## ओल आगळ्या स्मृतींची

ओल आगळ्या स्मृतींची
गाव जागवीत आली
झोपलेल्या हृदयाला
वेगे वर्दी देत गेली

विसरले होते सारे
असे कसे म्हणायचे
सुकलेल्या काष्ठामध्ये
अग्निदेव रहायाचे

जळ शांत शांत वाटे
वडवानल अंतरी
आत धुमसत राही
आग पाण्यासी तंतरी

हवा झुळुक वाटते
वादळाची शक्ती आत
वारा शांत तर ठीक
रौद्र रूप निसर्गात

आकाशाचे रंग वेडे
कसे कोणते सांगावे
भाव तसेच आकार
दिवे झुंबरा टांगावे

वसुंधरा पोसणारी
वसू देत तोषणारी
आत लाव्हा उसळता
लाही लाही करणारी

तशा जाळणाऱ्या स्मृती
कधी सुकवत जाती
कधी पोटात घेऊन
अशा गडपही होती

कधी ओल आपुलकी
स्मृती ओलवीत जाती
कधी मंद वाऱ्यासवे
स्मृती झुलवती नाती

कधी आकाशा एवढे
मन स्मृतींनी दाटते
पांग वाट पाहण्याचे
आठवे जाळे फिटते

स्मृती खरोखर ओल्या
चिंब भावनांनी झाल्या
एक सुगंधी अत्तर
अंगी शिंपडून गेल्या

दि. ०८/०४/२०२२
सकाळी ११.४९ वा.

## (१८)
## जीव कुठेच नको तो जडणं

बेता बेतानं घ्यायचं असतं
पाणी गाळून प्यायचं असतं
जगी कुणी कुणाचं नसतं
हेच ध्यानात घ्यायचं असतं

उगा वाटतं कुणीतरी आपलं
ज्याला मनात जिवापाड जपलं
मग एकदिस असंच कळलं
त्याचं काळीज कुठंतरी जुळलं

कधी उन्हात सावली घ्यायची
कधी अनाथ माऊली व्हायची
कधी तहान व्याकूळ जिवाला
मुखी पाण्याची धारही द्यायची

रोज नव्यानं पहाट फुटणं
रोज रोज कामाला जुटणं
रोज कुणापुढं तरी झुकणं
कोसळून कितीदाही उठणं

एक बीज मनातून रूजणं
त्याला अंकुर कवळा सजणं
आत मनात आभाळ भरणं
चिंब भावनेत पुरतं भिजणं

तरी कुठंच न गुंतून पडणं
आपणच आपुल्याशी भिडणं
नको नको ते उगाच कुढणं
जीव कुठेच नको तो जडणं

दि. १३/०५/२०२२
सकाळी ०७.४३ वा.

## (१९)
## सुगंध आजचा हुंगावा

कधी कोणत्या वळणावरती
भेटून जाते कोण
खुणा मी जपल्या नाजूक काही
ओरबडेही दोन

अब्जावधी माणसे भूतली
कोण येई जीवनी
कसले कोडे गणित कोणते
उकल न होते मनी

क्षणाक्षणांची अवचित गाठ
भेटीलागी मनात आस
कधी कुणी ना आले तरीही
जवळी असण्याचा तो भास

प्रवास असते जीवन निव्वळ
क्षणिक भेटीची कथा पहा
भेटून पुन्हा कधी न भेटणे
तरीही स्मृती दाटती अहा

आला गेला सारे निश्चित
अजाणतेपणी माणूस हा
जणू जाणतो असे वाटते
जगण्याचे तत्त्वचि पहा

म्हणून आला क्षण आपुला
भरभरून तो अनुभवा
न काल येतो उद्याही नाही
सुगंध आजचा हुंगावा

दि. २९/०४/२०२२
सकाळी ०९.४३ वा.

## (२०)
## आत्मविश्वासे
## जग जिंकते

असू दे मनी
आत्मविश्वास
जगण्याचा तो
ठरू दे ध्यास

जे सर्वांठायी
आपुल्यातही
का घाबरावे
दिनरातीही

स्वतःस जाण
लाभेल मान
आधी आपुला
विश्वास ठाम

सामर्थ्य माझे
निश्चित आहे
रुधिर वेगे
जे वाहताहे

मी का पळावे
मी का ढळावे
आत अजून
मी एक कळावे

आतला जो मी
कणखर मी
त्यास जाणता
प्रखरंच मी

साध्य सुसाध्य
सहजी होते
आत्मविश्वासे
जग जिंकते

दि. ०२/०६/२०२२
सकाळी ०७.१७ वा.

## (२१)
## लाडू

लाडू आनंदाचे पाडू
त्याने सुखाचे चित्र काढू
कधी मनातून फुटती लाडू
कधी पंगती वाढू

कण कण मोतीचूर असो वा
अन्य कोणताही तो
दोन हातांनी सांधून बांधू
प्रेम स्नेह पाघळतो

कणाकणातील गोडी उतरून
मधुर होतसे लाडू
कण कण त्याचे खरे अस्तित्त्व
तरी मिरवतो लाडू

असो हजारो कण वेगळे
मजा न खाण्याची ती
वळला जातो लाडू जेव्हा
गंमत खाण्याची ती

गूळ साखरेचे ना दिसते
रूप कुठे नजरेला
तसाच जगण्यासाठी गोडवा
हृदयातून विरघळला

प्रतीक होतो सणसंस्कृतीचे
लाडू दिसतो गोडू
चला जीवनी सुंदर क्षण हे
लाडूसारखे जोडू

एक एक मग घास चाखू या
एकत्रित होऊनी
एकत्रित ते सारे क्षणही
हसतील लाडू होऊनी

दि. ०५/०५/२०२२
सकाळी ०६.३२ वा.

## (२२)
## हृदयाकाशी प्रकाश

सुसाट वारा नभी पसारा
कसे कुणा सांगावे
उन्मळतील का मुळे येथली
संकटांनो पांगावे

कसे मिळूनी येता धावुनी
गडगडाट मेघांचा
वीज तळपते दिपवून डोळे
ठोका चुके हृदयाचा

सुटला वारा पिसाट झाला
आगापिछा न ठेवी
उधळून नाचत सुटला वेडा
संगे उडवून नेई

गार जाहली हवा बोचरी
अंगा येई शहारा
घरादारावर घनगंभीर त्या
आभाळाचा पहारा

प्रकाश गेला दडपून सारा
अंधाराचे राज्य
उगाच येते वरती भीती
तिचे पसरे साम्राज्य

कधी एकदा सरते मळभ हे
मोकळे हो आकाश
आत प्रकटतो स्वच्छ पांढरा
हृदयाकाशी प्रकाश

दि. २३/०७/२०२२
रात्री ०८.०९ वा.

## (२३)
## तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

तुझ्या सांडण्याला नको भेदभाव
ते पावित्र्य हृदयी, तुझे नित्य नाव

कुणा पदरी देतोस धनधान्य कोटी
कुणाला फिरविशी मुखी घासासाठी
पूस एकदा पाप नामक गाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाला सुखाचे पदी गालिचे अन्
कुणाला का देतोस जळते निखारे
कुणी शांतचित्ती, कुणा केवढी हाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

जे कर्म घडते नकळता असे ते
कसले हिशोबन् कसल्या पखाली
कर माफ तू एकदा सारे डाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाला फुले रेशमाची मिळावी
कुणाला उगा काटे रे बोचताती
भर एकदा तू कृपे सारे घाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाचे मरणही किती गौरवाचे
कुणाचे जिणे ते किती व्यर्थ जाते
तू मोक्षधामी ने साऱ्यांची नाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

देतोस गठडी अशी संचिताची
न आठवते काही, तुला जाण त्याची
ग्रहांना दे साऱ्या सुयोगाचे वाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

दे एकदा सारे सोडून तूऽऽही
किती काळज्या वाहतो देवा तूही
जीवाला शिवाचा लळा घट्ट लाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव
ते पावित्र्य हृदयी तुझे नित्य नाव

दि. १५/०७/२०२२
सायं. ०७.१३ वा.

## (२४)
## हे केवढं मोठं भाग्य असतं

फलाटावर, स्थानकावर
सोडवायला आलेल्या कुणाचे तरी डोळे
आपल्यासाठी पाणावतात, मनातल्या
आपुलकीने डबडबून जातात
हे केवढं मोठं भाग्य असतं

कुणीतरी दूरवर अंतर तुडवत
आपल्यासाठी भेटीच्या ओढीने येतं
काही क्षण फुलवून जातं
हे केवढं मोठं भाग्य असतं

कुणीतरी जन्मभर आपलं होऊन जातं
आपल्यासाठीच विचारात काळजीनं
धागे विणत जातं घट्ट
हे केवढं मोठं भाग्य असतं

कुणीतरी आपल्यासाठी वाटेला डोळे
लावून
रातभर जागतं, वेड्यासारखं प्रेम देत
वेड्यासारखं वागतं
हे केवढं मोठं भाग्य असतं

कुणीतरी क्षण क्षण झुरतं,
आठवणीत उरतं
घट्ट हात पकडून धरतं,
जगण्याला उत्साही करतं
हे केवढं मोठं भाग्य असतं

कुणीतरी ना नात्यात ना गोत्यात
ना घरात ना दारात, तरी मनाचा ठाव
घेत कणात, क्षणात, मनात अन पदोपदी
स्मरणात असतं
हे केवढं मोठं भाग्य असतं
हे केवढं मोठं भाग्य असतं

दि. १५/०७/२०२२
सायं. ०६.२२ वा.

## (२५)
## असे सूर जुळले काही

असे सूर जुळले काही
मंद चांदण्यात
रात्र थिजली आहे अजुनी
इथे अंगणात

तारा जुळल्या रम्य सुंदर
छेड अंतरंगी
क्षणोक्षणी सहवासाचा
मोह तो सुगंधी

कधी शब्द गीत होती
कधी मूक भाषा
तुझ्या माझ्या प्रीतरंगी
नाहलेल्या दिशा

देण दैवी असती नाती
जुळती स्वर्गकोशी
त्याच कृपेमुळे सजनी
आज माझी होशी

भाव पोचले ते ह्रदयी
साद ऐकू येई
सूर जुळले जे मनीचे
नाद मुग्ध होई

दि. २३/०७ २०२२
सकाळी १०.४३ वा.

## (२६)
## नितांत जगणे न्यारे

नितांत सुंदर जग हे आहे
सृष्टी नितांत रमणी
फुले उमलता नितांत कोमल
नितांत शांती वनी

नितांत भव्य आकाशातून
सूर्यचंद्र तारका
नितांत ध्येयासाठी पक्षी
घेती भरारी बरं का

नितांत सागर विशाल येथे
गहनही नितांत तितका
जलचर विश्वामधुनी कधीतरी
निवांतपणा हा इतका

नितांत वैविध्याचे प्राणी
अगणित जीवही जगती
नितांत त्यांच्या गाथा अनोख्या
नितांत त्यांची नाती

नितांत बुद्धीसामर्थ्याचा
नितांत विकसित मानव
नितांत जपणे त्याने सारे
नितांत रक्षक हा नव

नितांत प्रीती मनात भरती
नितांत भाव उमलणे
नितांत हळव्या मनामनांचे
ताटवे नवेच खुलणे

नितांत पावन श्रद्धा आमुच्या
नितांत पावक भक्ती
नितांत नमने ईश्वरचरणी
नितांत मोठी शक्ती

नसो बंधने नितांतास या
नितांत राहो सारे
नितांत असू दे सुगंध भरले
नितांत जगणे न्यारे

दि. २३/०८/२१
सकाळी ०९.२१ वा.

## (२७)
## **जिवाभावाचं गोंदण**

किती गोंदण गोंदण
माझ्या मनास आंदण
आठवांची हो सांडण
जिवाभावाचं कोंदण
किती गोंदण गोंदण

शरीरावर दिसतंया
वर कोरलेलं गोंदण
आत मनाच्या पटलावर
ढवळं पडतंया चांदण
किती गोंदण गोंदण

जखमांची कमी न्हाय
कमी आपुल्या माणसांची
कधी कवा कोण भेटंल
त्यांचं काळजाला लिंपण
किती गोंदण गोंदण

काढताना किती बाय
माझ्या मनात उत्साह
नगं नगं वाटतंया
कवा कवाशी गंधणं
किती गोंदण गोंदण

ज्याच्या खुणा म्या गोंदाव्या
त्यानं जीवाला ववाळावं
जवा पिरतीचं खोल धागं
तवा नक्षीला सांधणं
किती गोंदण गोंदण

त्यो बी देतोया जल्मासंगं
पक्कं नशीब बांधून
कसं पुसावं सटवाईचं
लेख पाचवीचं कोरणं
किती गोंदण गोंदण

ऐक सांगत्ये म्या काय
चढवावं एक गोंदण
त्याच्या गोंदणावर आपलं
भल्या कामाचं शिंपण
किती गोंदण गोंदण

भलं भलं हे गोंदण
त्याचा हिशोब न ठेवणं
कर्तव्याला करणं
अलगदसं सोडणं
अस्सं गोंदण गोंदण
जिवाभावाचं गोंदण

दि. ०१/०८/२०२२
सकाळी १०.२२ वा.

## (२८)
## मैत्र वैश्विक भावना

मैत्र जडावे कशाशी
नितळशा या मनाशी
आत्मभाव अंतरंग
तत्त्व सुंदर जनाशी

नाही वयाचे बंधन
नच लिंगभेद जाण
एक पवित्र धागा हा
मैत्र जुळणारा मान

मैत्री निभावणारा हा
हवा सखासखी कोण
जीव एक होतसे हो
मैत्र शरीरे ती दोन

उभा राहतो पाठीशी
कधी धाव त्याची कशी
जाय संकटे माघारी
मैत्रभावनाच अशी

कुणी माणूसच हवा
मैत्र सांभाळून घेण्या
असे अजिबात नाही
मैत्र वैश्विक भावना

करू निसर्गाशी मैत्री
डोले सुंदर धरित्री
झाड वेली फुलं पानं
तेज चंद्र नि सवित्री

मैत्री ग्रंथांशी जडावी
विचारांची लयलूट
करी सधन विचार
नाते अतुल्य अतूट

पशुपक्षी चराचर
सृष्टी देवाची सुंदर
मैत्र जगाशी करावे
मन विशाल अंबर

माय बाप नातीगोती
मैत्र निखळ सांगती
मैत्रीसवे रेशमाची
नाती सुरेख रंगती

साथी जीवनात येतो
सखा सप्तपदी होतो
सप्तजन्म चालताना
मैत्र जीवाभावी होतो

मैत्र कुबेर खजिना
मैत्र धनिक सुजाणा
परस्परे जडवावे
ज्ञानेशाचे सूत्र जाणा

ज्याला मैत्र हे आकळे
जगणेच हो सुफळे
असे मित्र भेटो जीवा
मनी चैतन्य उसळे

दि. १/०८/२१
सकाळी ०८.११ वा.
जागतिक मैत्री दिनानिमित्त

## (२९)
## मोजदाद ही कशाला

धुंद असा हा प्रवास वाटे
नश्वर इथल्या गाठी
तरी जन्मभर मरमर माणूस
स्थानक गाठण्यासाठी

किती कोणते कसे प्रवास हे
कुणास ठाऊक नाही
तरी आठवणी अमाप जोडून
करतो नियोजन काही

उघडून खिडकी हुंगून घ्यावी
जरा हवा मोकळी
मनातली बघ भरून जाते
तिच्यासवे पोकळी

किंचित घेशील मिटून नेत्र हे
जाणीव वेगळी होई
स्पर्शून जाते एक भावना
मनात शिरवा येई

स्थळ काळाचे गणित मोडून
धावधावते वेडी
कुठे केवढी धावत जाईल
आयुष्याची गाडी

ऐक सख्या तू क्षण जग ना रे
नकोच साऱ्या चिंता
उगा वाढवून ठेवीशी आपण
सरळ धाग्याचा गुंता

श्वास मोकळा श्वास ढाकळा
नको कोंडू श्वासाला
श्वासावरती मक्तेदारी
मोजदाद ही कशाला
वेड्या मोजदाद ही कशाला

दि. २९/०७/२०२२
रात्री ०९.३१ वा.

## (३०)
## प्रश्न नाचती

किनार मजला
मिळे कशाची
कशास चिंता थोडी

कशास वाहू
कसे सोडवू
अनाकलनीय कोडी

रोज उभारून
प्रश्न नाचती
नंगेनाच बीभत्स

मीही ना डळमळते
कधीही
मानते त्यांना वत्स

जिकडून तिकडून
हेटाळणी ती
त्यांचेही कमनशीब

अलगद देते त्यांना
कुशी ही
विसावण्याचे कसब

असे मायेने विरघळून ते
प्रश्नचि
उत्तर देती

माझेही क्षण
सारे कुपीतून
अत्तर होण्या जाती

दि. १५/०९/२१
सकाळी ०६.३२ वा.

## (३१)
## मन कुणाला कळे रे

खुंतून बसते कधीचे रुसते
मन अडेल तट्टू
कधी कुणावर भाळून बसते
किती होई लट्टू

मनासारखे होते न जेव्हा
ते मनात खट्टू
भय कशाचे अति वाटता
मन भित्रे फट्टू

मनात चाले राज्य मनाचे
तेच तिथे राजे
त्याच्या यशाचं गीत गाई ते
स्वतः गाजे वाजे

तेच ठरवते गुन्हेगार कोण
कोण भला चांगला
कधी कुणाशी मैत्र जवळचे
कुणी फाशी टांगला

समज तयाचे तेच जाणते
गैरसमजही त्याचे
कधी तयाचे मन हे मोठे
कधी कोते हो त्याचे

मनात सारे सारे शिजते
चेहरा जणू पारखा
किती जवळचे असले कुणीही
भाव येतो पोरका

क्षणात चंचल क्षणात अविचल
क्षणात बांधावरती
वेडे अचपळ मन हे माझे
सदाच त्याला भरती

कुणी मनाला थोपवेल का
मन हे सुसाट वारे
काय रसायन कसले बनते
मन कुणाला कळे रे
मन कुणाला कळे रे

दि. ०२/०९/२१
०८.२३ वा.

## (३२)
## मोकळे तुज आकाश

जग स्वतंत्रतेने जसे वाहती
वारे स्वच्छंदी
जसे उगवती तृणांकुरे ही
भूमीवर धुंदी

स्वतंत्रतेच्यासाठी जन्म तव
जाणून घे हृदया
ऐकून त्याची हाक चाल तू
ऐटीत हे सखया

जग मुक्तपणे बघ सौंदर्याला
तव अवतीभवती
शब्द निनादे पाठीमागे
अवचित तव येती

नको खचू तू सदैव पहावे
नभांगणातील तारे
कसे मोकळे विश्व तयांचे
स्वतंत्र लुकलुकणारे

भिंत कोणती बंदी न करेल
स्वतंत्रपणे तू रहावे
स्वतंत्र गर्जन लाट जणू तू
उसळून आतून यावे

नको लपवणे स्वतःस कोठे
जगणे अमूल्य ऐसे
मौलिक होते तेही तेव्हाच
मुक्त स्वतःशी जैसे

वावर स्वच्छंदाने मोकळे
मोकळे तुज आकाश
मुक्त मनाला ठेव सदा तू
मोकळा घेई श्वास

घेत मोकळे गंध वेगळे
जगण्याची बन आस
स्वच्छ मोकळ्या नभातला घे
अंगावरती प्रकाश

दि. ०३/०९/२१
सकाळी ०८.१९ वा.

## (३३)
## रत्ने लावण्याची

लावण्य भेट एक अशी लाभते
दैवी रचना भली
कसे घडवितो मूर्तीकार तो
अंगोपांगाची कळी

उमलून उमलून येते हलकी
कायेची पाकळी
झिरपत जाते सौंदर्याची
किमया त्यात टाकली

लावण्याची जादू मनावर
गारुड संपत नसते
सुंदरतेची ती परिभाषा
अलगद सांगत असते

नखशिखांत कधी लावण्याचे
उदाहरण चांगले
कधी कुठे तर थोडे थोडे
देखणेपण ते दिधले

बुडून जातो, डुबून जातो
रसिक कितीदातरी
त्यातच खर्ची घालून येतो
आयुष्याची शिदोरी

कधी लाभते लावण्याचे
धन आपुले होऊन
कधी दुरूनच क्षणिक रमणे
दिड.गमूढ होऊन

वरपांगी ना केवळ असते
शरीर लावण्य ते
मनात उतरून खरे पहावे
सौंदर्य अधिक रम्य ते

कधी विचाराने लावण्य
भुरळ पाडते मना
कधी कर्म चांगले कुणाचे
नयनरम्य जाण ना

कधी बोल अमृत माधुर्य
लावण्याची धार
त्याच्या हाती सौंदर्याचे
किती मनोरम प्रकार

खणीच असते न संपणारी
रत्ने लावण्याची
मनास इतुके करणे विशाल की
अगणित स्थळे भावण्याची

दि. २२/१०/२१
सकाळी ०८.२३ वा.

## (३४)
## चल जाऊ तिथे

चल जाऊ तिथे जिथे खेळ खुले
सखे जमतील जिथे इटुकले
असे सवंगडी मिसळून जाती
निरागस बालपणीची नाती

चल जाऊ तिथे कण ज्ञान अढळ
विद्येचे मोती वेच सकळ
वय आकारू येईल कसे
संस्कारांचे निज बिंब जसे

चल जाऊ तिथे धन कमाविण्या
नीतीची शिकवण रूजविण्या
फुकाचा छदामही नको उगा
घाम गाळुनिया मिळवायाचा

चल जाऊ तिथे परिवार जिथे
निज कर्तव्ये हर्षोल्लासे
ऋण मातापित्यांचे नात्यांचे
ना फेडू शकू असे प्रेम तयांचे

चल जाऊ तिथे जिथे सखी मिळे
जगण्याला मज नवं कारण दे
त्या प्रीतीच्या कोमल भावा
इंद्रधनूसम रंग नवे

चल जाऊ तिथे नवी वेल फुले
मज लेकुरे करता घर गोकुळे
हसणे खिदळणे बालपणीचे
क्षण अनुभवण्या मन उसळे

सार्थ कृतार्थ हे जगणे होऊन
देशास्तव काही करण्याला
चल जाऊ तिथे सर्वस्वही मग
निज राष्ट्राचरणी वाहण्याला

किती रमशील असल्या ऐलतीरी
पावा ऐकू ये पैलतीरा
चल जाऊ तिथे निजधाम असे
क्षण अविचल मुक्ती येई करा

दि. २८/१०/२१
सकाळी ०९.२३ वा.

## (३५)
## रांगोळी

स्वच्छ मनाचे अंगण
सडा सारवण करू
ओल्या गंधाळल्या जागी
रांगोळीचे रंग भरू

आधी भावनांचे सारे
नीट नियोजन करू
मग किती थेंब कसे
योग्य अंतरे साकारू

आता वेगवेगळाले
सारे थेंब जोडायाचे
नक्षी रेखीव मनात
छापे काही सोडायाचे

भावभावनांना आता
रेखा रेषातून जोडू
एक चित्र देखणे हे
रंगोळीतून त्या काढू

सप्तरंगांचे अनेक
रंगछटा मिसळून
आनंदाचे नवनीत
काढे रांगोळी घुसळून

सारे खुशीत येतात
नाही रुसवे फुगवे
रंग अलगद घेती
सामावून सारे धागे

आता आजूबाजू काही
गेली रांगोळी पसरूनी
सांडलेली नाती वेडी
घ्यावी नकळत ती पुसुनी

छान सुबकशा रेषा
जीवनाच्या आरेखाव्या
रंग संगती मोहक
मन रांगोळीत पहाव्या

जरी मोडली कधी ती
कुणी रांगोळी आपुली
पुन्हा भावनांचे थेंब
जोडू रांगोळी काढली

रंग रेषा अपुल्याच
आपुलीच नक्षी नवी
सांगा कशाला ते दुःख
सुख आकृती झलकावी

दि. २९/१०/२१
०८.१४ वा.

## (३६)
## ओजसाचा धरू कर

ओज ओजस नभाचे,
ओज तेज ते लेऊन
व्हते पोटूशी धरणी,
ओजमाया पांघरून

जीव जीवांचे कारण,
सस्य बीज तिच्या ओटी
रूप गर्भार माय,
कित्ती दिसते गोमटी

ओज दिसामासी वाढे,
अगा ब्रह्मांडा एवढे
आत इवले रुपडे,
मधुमधुर केवढे

आकारून साकारून,
पेशी पेशी ओजावली
अणुरेणू सांधुनिया,
कुडी कशी तेजावली

ब्रह्म ओजसाचा धागा,
मूळ स्रोत होय जागा
कण कण ओजसाचा,
जिवा अहंभाव उगा

ओजसाचेच जोंधळे,
पीठ ओजस सांडते
चूल मांडून विश्वाची,
आदिमाया की रांधते

तिची भाकर ही गोल,
सारे ग्रह तारे गोल
गोल फिरते धरणी,
फेर चौऱ्यांशीचा गोल

नको फिरण्याची भूल,
चूल सावरू सकळ
ओजसाचा धरू कर,
शांती ओजात नितळ

दि. २५/१०/२१
दुपारी ०२.२४ वा.

## (३७)
## अन्नापुढे नाही कुणी

अन्नासाठी दाही दिशा
जीव तगण्याची आशा
पशुपक्षी प्राणी असो
अन्न ग्रहणास पिसा

कण कण किती
भुकेजल्या गरजेचा
भुकेल्याच्या आत भरे
अणू अणू ऊर्जेचा

मानवाचे काम आहे
चिंता साऱ्यांची वाहणे
परी आज त्याला नाही
सुचतच काही देणे

अन्न तारी जीव जीवा
सारी कसरत भारी
कुणी नाही दिले तर
हिसकावून फरारी

डोळा दिसताच घास
नेम धरुनिया खास
पक्षी पळवती त्यास
नको रडू जरा हास

अन्न दान महादान
घडो सतत इमान
अन्नापुढे नाही कुणी
सान अथवा महान

स्वये शिव मागे भिक्षा
देते शिवानी ही दक्षा
अन्नपूर्णा माय होता
शमे साऱ्यांची बुभुक्षा

व्हावे तिचा अंश नित्य
दान अन्नाचे सतत
भुकेजला नको कोणी
हेच व्रत मानवास

दि. १२/११/२१
सकाळी ०९.४३ वा.

## (३८)
## अजब असे भोवरा

भोऽऽवरा भोऽऽवरा फिरतो गऽऽरागऽऽरा
स्वतःच्या भवताली गुरफटतो जरा जरा

जळी स्थळी अन् फिरवू तिकडे फिरणे भरा भरा
आधी त्याला दोऱ्यामध्ये गुंतवणे हो करा

त्याचे फिरणे भरभरभरभर गरगरगरगर गरा
भोवळ येऊन हलते सारे कातरते ही धरा

पाण्यामध्ये दडून बसला गिळतो अजब भोवरा
अनोळखी या जळ पाणवठी सांभाळून वावरा

विचारातल्या विचारात जर गुंतून बसे भोवरा
भानावरती येऊन पुन्हा हळूच स्वतः आवरा

रस्ते जाती गुडूप होऊन चक्र चकवा भोवरा
सावध चाला मार्ग पारखून जीवास घोर घाबरा

परकीयांच्या आक्रमणाने संस्कृतीवर
भारतीयांच्या मूळ तत्त्वाला भोवऱ्यातून सावरा

संसाराचा फिरतो भवरा कधी न थांबे खरा
सुटका होण्या केवळ अध्यात्माला जवळी करा

शब्दप्रभूंनी शब्दांमधुनी आनंदाला पेरा
जीवास करूनी मुक्त येथुनी चुकवाव्या त्या चकरा

दि. २६/११/२१
सायं. ०५.३७ वा.

## (३९)
## फुलतो शहारा

फुलतो शहारा
भावनांचा तो फुलोरा
कधी सुखद तर
कधी दुःखाचा त्या किनारा
फुलतो शहारा ...

ऋतू ऋतुतही अंगावरती
त्याच्या खुणा
मिरवी पुन्हा
देत पहारा
फुलतो शहारा

नवथर स्पर्शातून उलगडती
नवरेशीम जाणिवा
नव्या गुद्‌गुल्या मना
सुंदर भावपिसारा
फुलतो शहारा

अघटित घटना पाहून ऐशा
दुःख होतसे जना
सरसर काटा फुलतो अंगी
वाहे भीतीचा वारा
फुलतो शहारा

अनुभव काही देत प्रचीती
गुरुकृपा वा ईशकृपेची
आठवताना पुन्हा पुन्हा ते
भक्तिभावना येत उभारा
फुलतो शहारा

हव्या हव्याशा अथवा नकोश्या
काही क्षणांचा होय पुकारा
तनुवर रोमांचांच्या कलिका
फुलेल मनी या भाव धुमारा
फुलतो शहारा

दि. १९/११/२१
सकाळी १०.२३ वा.

## (४०)
## सुखे दिसावा पैलतीर मज

दे एक अर्थ मज जीवन घडण्या
उत्तरार्ध हो सुखी
गात्रांमध्ये शक्ती माझ्या
असेल रे पूर्वार्धी

किती द्यायची दुःखे दे तू
आयुष्यातील वाटा
तरीही वाट मी शोधीन नक्की
पुण्य असू दे साठा

आज मी पचवीन विपरीत काही
नको शेवटी घाला
नसेल शक्ती देहामध्ये
मनात कालव काला

सुखे दिसावा पैलतीर मज
धाम मुक्तीचे द्यावे
ऐलतीराच्या कथा विराव्या
जीव शिवाला पावे

शेवटी लोचनी अश्रू येऊ दे
आनंदाला भरती
कृतार्थ होईल जगणे इथले
कृतार्थ चिन्हे उरती

दि. ११/१२/२१
सायं. ०५.३२ वा.

## (४१)
## कसा कळावा थांग मनाचा

पुढे पसरला अथांग सागर
अखंड लाटा गाज
सागर ल्येतो प्रचंड पाणी
जलसाठा त्या साज

असेल कुणाशी बोलत कधी तो
मनमोकळे वेडा
की लाटांच्या लाटा म्हणजे
मनास त्याच्या वेढा

मन मानवी असेच सागर
किती विचारी लाटा
उसळून येती सदा सदोदित
क्षणात पटपटपटा

कसा कळावा थांग मनाचा
सागर अथांग जैसा
रत्ने दडली खोल तळाशी
कुणी करावा उपसा

मला वाटते बाहेरचे ना
कोणी सशक्त ठरते
ज्याचे त्याने डोकावून मग
आत करावे भरते

सागर आपुला लहरी आपुल्या
थांगही आपुला आपुला
शांत राहतो वरवर वाटे
वडवानल तापला

आत केवढा असे पसारा
चला आवरू थोडा
अथांग सागर उनाड वारा
चला सावरू थोडा

दि. १६/१२/२१
सायं. ०६.३७ वा.

## (४२)
## बाजार मांडलाय देवाच्या दारी

बाजार मांडलाय देवाच्या दारी
फुलंही त्याची पानंही त्याची
त्याचेच हारं न त्याचीच दोरी
माणसाची चाललीय उगा शिरजोरी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

राबणारे हात शेतात दिनरात
घामाचं मोती शेतकरी पिकवती
पैक्याची वाणवा कष्टाची मस्करी
दलाल खुश त्याची फुकाची चाकरी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

गाईम्हशी सांभाळी गुराखी आळी
खव्यात मैदा भेसळ भेसळी
भुकेनं पोटशूळ गरिबा घरी
मिठाई देवाच्या प्रसादा भारी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

नवसाचं पीक बघा लईच सुपीक
भाजतीया पोळी भीतीची कणिक
पावणाऱ्या देवाची प्रसिद्धी भारी
वाढतीया गरागरा ढेरी खाणारी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

भक्ती न भाव, नुसताच आव
गाभाऱ्यात कसला बडेजाव
कोण खरा देव, देवालाच भ्येव
देवात माणसात केवढी ही दरी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

श्वासात श्वास, देवाचा ध्यास
देवाला माणसातल्या देवाची आस
मोजून दिलेत, कळू न दिलेत
तरीही कळंना देवंच भारी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

दि. २८/१२/२१
दुपारी ०१.४५ वा.

## (४३)
## उतारवय

उतारवय खुणावत नसतं
खुणा केवळ सोडत जातं
एक सल अशक्तसी
काळजामध्ये मोडत जातं

सिंहासारखी निधडी छाती
पिंजरा होऊन खोकलते
छोट्या गोष्टी वाघ होऊन
परिस्थिती बोकाळते

आठवणीने संसार सारा
ज्याने समर्थ सांभाळला
आता जो तो हिणवतो की
म्हातारा विसरभोळा

ताठ मानेने जगणाऱ्याची
मानही आता ऐकत नाही
तिचा तिच्यावर ताबा नाहीच
हलणे मात्र सुटत नाही

भावनांवरही ताबा होता
कसं सगळं दडवायचो
मला हरायचा ताण नव्हता
जिंकणं सहजी घडवायचो

आता काही केलं काय
आणि काही नाही तरी
हरलेला गडी मी
उतारवय जर्जरी

ज्या हातात बळ होतं
थरथरतात सारखे ते
आपले डोळे आपले आसवं
टपटपतात सारखे ते

वयावयाचं वय असतं
वय हसवं वय फसवं
वयालाही वाटत असणार
एका जागी रहावं पक्कं

उतारवय उतरत चाललंय
तरी साथ देतंय बापडं
पैलतीरावर बोलावणारं
वयापल्याड मुक्ती झोपडं

दि. २५/१२/२१
सकाळी ११.२३ वा.

## (४४)
## कळते ना गणित कोणा

चुकतो कधी कुणी अन्
शिक्षा कुणास मिळते
असे वेगळेच फळ हे
जगतात कसे फळते

नसताच दोष आपुला
हे भोग भोगायाचे
असते कुणी का आपुले
कोणावर रागवायचे

असते नशीब काय
अन् संचिताची गठडी
की असते जगती ऐसी
न कळती काही पठडी

असते हे मागचेच
चुकते हिशेब करणे
कळते ना गणित कोणा
सूत्रास आजमावणे

डोळ्यात येते पाणी
कारण उघड ना होई
येतात नाती कोणी
होण्यास उतराई

चाला गुमान पुढती
कसला विचार आता
जुळती ना वजाबेरीज
हातचे कितीही धरता

कसले हे कोडे आणिक
उत्तर न मिळे काही
सुटले ना बंध इथले
थकल्या दिशा ह्या दाही

दि. २३/१२/२१
रात्री ११.५८ वा.

## (४५)
## आजारापेक्षा उपाय गंभीर

आजारापेक्षा उपाय गंभीर
सांगा ना कसं हो रहायचं खंबीर
कोड्यात कोडं पडलंय आज
सापाला गिळून बसलाय उंदीर

देवाचा पत्ता बदललाय अन्
गर्दीनं भरून गेलंया मंदिर
अनीती उजळ माथ्यानं हिंडतीया
मलिदा खाऊन बिळात उंदीर
सांगा ना कसं हो रहायचं खंबीर

माणसाची नाडी लागंना खरी
वैद्याचा मेंदू थकलाय जरी
डॉक्टरचा भरवसा यंत्रावर
संगणक गुंडाळून फरार उंदीर
सांगा ना रहायचं कसं हो खंबीर

आलेत बाप्पा फिरायला इकडं
टांगलीया संस्कृती सगळंच त्रांगडं
भक्तांची थेरं आकसले बाप्पा
सोन्याचा होऊन थिजलाय उंदीर
सांगा ना रहायचं कसं हो खंबीर
आजारापेक्षा उपाय गंभीर

दि. २७/१२/२१
रात्री ०२.४१ वा.

## (४६)
## जगण्याचे सारांश येथले

सार कशाचे कसे काढावे
कधी कळेनासे होते
गरगर गरगर फिरणारे हे
कर्मधर्माचे जाते

कर्मचक्र चालते निरंतर
माणूस भर टाकतो
सारासाराच्या चिंतनातुनी
स्वतःस उन्नत करतो

कधी कळावे सूत्र जगाचे
कधी गोंधळून जावे
कधी हिशोबांचे जथ्थे अन्
कधी आकडे सुटावे

किती मिळवले किती गळाले
हाती काय काय उरले
संचिताच्या गठडीमध्ये
संचित अजुनी भरले

जगण्याचे सारांश येथले
किती लोक हळहळले
परलोकाची यात्रा सहजी
कर्म घडो चांगले

दि. ११/०१/२२
सकाळी ११.२३ वा.

## (४७)
## हवेहवेसे वाटते जीवन

धुके पसरले क्षितिजावरती
गतकाळाचे धूसर चित्र
कधी कोण झाले ते शत्रू
कधी अनामिक कोणी मित्र

पैलतीरावर सारे पुसटसे
ऐलतीरावर सारे स्पष्ट
म्हणून वाटते पहावे जवळचे
गतकाळाचे नकोच कष्ट

एक नदी दो काळामध्ये
झुळझुळ नादातून वाहते
काळ सरकतो तिच्या जळासम
प्रवाह घेऊन जगणे वाहते

नाव कधीतरी सहज डोलते
कधी अगणितसे ते हेलकावे
कधी पाय मोकळे सोडुनी
जळात बुडवून काळज्या द्यावे

हिरवीहिरवी हिरवळ दाटे
सुंदर सुंदर गोड क्षणांची
विसरून जाते मीही मरगळ
दुखऱ्या सलत्या बुजऱ्या मनाची

एक मोकळा श्वास मी भरते
शीतल गंधित होते तन मन
कधीतरी असे देत दिलासे
हवेहवेसे वाटते जीवन

दि. ०४/०१/२२
दुपारी १२.३८ वा.

## (४८)
## तीर खुणा मज जपतो

तीर कुठे संपतो नदीचा
तीर नदीचा नदी तीराची
किती आपदा झेलून जाते
अशी गुणाची नदी धीराची

ती विसावे कुठे कधी अन्
कशी कुणाला ठाऊक
तीर एकटा तिचा सोबती
सुखदुःखे बघ घाऊक

वाहत जाणे पुढे पुढे पण
वळणे ठाऊक नाही
एका सागरा भेटण्यासाठी
जगणे उधार राही

जो तो येतो पाप पुण्याच्या
गठडी धुण्यासाठी
माझ्या तळाशी काय साठले
समजून ना घेण्यासाठी

तीर दिलासा तीर भरवसा
साथ न सोडी कधीच
रात्र असो वा दिवस गलबलीत
तीर नदीच्या आधीच

कुणा वाटते बंधन त्याचे
तीर नदीस बांधतो
खरे सांगू का तो तर माझ्या
भावजळा सांधतो

एक सांगते नदी संपते
तीर खुणा मज जपतो
युगायुगांती नदी होती इथे
तीरंच सांगत असतो

दि. २६/१२/२१
दुपारी ०२.५४ वा.

## (४९)
## लागे किनारी नाव

जाणे ज्याचे त्याला पुढती
हात दिलासा देईल
कधी कुणाचा सहज आधारही
बळ हत्तीचे देईल

हत्तीसाठी सुद्धा असते
प्रेरणा किती गरजेची
अवाढव्य ते शरीर आपुले
वाहून ते नेण्याची

माहूत त्याचा मित्र
देईल जर का हात
दिलाश्याने त्या गजराजही मग
चढवील तनु यानात

करणे असते ज्याचे त्याने
आपुले आपुले काम
तरीही स्नेहाचा एक कटाक्ष
लाखमोलाचे नाम

पापपुण्याचे संचित भोगणे
जीवन त्याचे नाव
निखळ साथ जर मिळते कुणाची
लागे किनारी नाव

दि. १३/१२/२१
सकाळी ११.३४ वा.

## (५०)
## झाड मानवी सुकू न द्यावे

गळली पाने शिशिर सांडला
दुर्दैवाचा खेळ मांडला
अन्य तरुंवर कृपा सृष्टीची
पानांविन मज श्वास कोंडला

कोसत बसलो रोज मला मी
शिशिर कुठून हा आला वैरी
हरित संपदा लुप्त जाहली
कट्याकुट्यांची कुडी राहिली

नाही पक्षी कुणी विसावत
कुणी साधे मज नाही पाहत
सुकल्या संपून गेल्या संपदा
आहे कफल्लक वृक्ष आज हा

ती किलबिल ते कूजन रम्य
त्या फांद्या फुले पाने सुरम्य
ते माझे बहराचे सुदिन हो
वसंतातले मोहक अंगण

आले अचानक ढग पिंजारून
शुभ्र कापशी शाल पांघरून
निळ्या आभाळी मेघ मालिका
शुष्क झाड बघ आले तरारून

झाले झाड किती सुंदर सुंदर
दुःख क्षणातच हो छु ... मंतर
असे अचानक सुख ये धावून
कशास कोसणे मनास आतून

सुकल्या झाडावरी नभातून
रजत ऋतुची झाली पखरण
झाड मानवी सुकू न द्यावे
अशा सुखाचे गाणे गावे

दि. १०/१२/२१
दुपारी १२.११ वा.

## (५१)
## पाचोळा जन्मा आला

गळला जरी पाचोळा
जा सावकाश त्यावर
रखरख उन्हात त्याने
छाया दिली डोईवर

जीव गोळामोळा त्याचा
परी आत संवेदना ही
कोणी ना तुडवून मजला
असह्य वेदना द्यावी

उपकारांची जाणीव
ठेऊन आत ती खोल
जपणे भवतालीच्या
गोष्टींचे अमोल मोल

झाडावर पालवी
हिरवी हिरवी बहरे
आजीवन सर्वांना
शीत सावली पसरे

उन्हास झेलून मोदे
पानांची सोन दिवाळी
सोसून चटके हसणे
शिकवण झाडाची झाली

कुणी जीवनी ऐसे
आधारवडासम होते
उन्हात रापुन स्वत:
सावलीस पसरून देते

ती कर्म पल्लवी त्याची
थकून गळली जाईल
पण खुणा पाचोळ्यासम त्या
गालिचा वेगळा होईल

स्मरून ते सारे हो
पाचोळ्याचे जगणे
अलगद त्याला स्पर्शून
मनात उचलून घेणे

पुन्हा उभारी येईल
गळल्या देठावरती
कोंब कोवळा उगवून
आशेच्या झाडावरती

हसला बघ पाचोळा
पुन्हा पल्लवी झाला
देह सुकला तरी त्याच्या
मनात अंकुर आला

पाचोळा जन्मा आला
पाचोळा जन्मा आला

दि. २४/११/२१
१२:१९

## (५२)
## घर माझे

या घराने काय ना दिधले मला
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।

रोज मी थकुनी हो येता वाट पाहे
रोज मजला ओढतो घरचाच ओढा
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।१।।

बालपण माझे खिदळले वाढले
ताटी वाढून माय माया लाडू पेढा
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।२।।

बहरला तारुण्य ऋतू अन उंबरा बरवा
आला शिंपित दारी मंद गंध केवडा
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा।।३।।

आजही मज वेल फुलतो संसाराचा
संगे माय बाप लेकरांचा गोड वेढा
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।४।।

जाणते हे घर सारे भाव माझे
त्याच्यासाठी आजही मज भाव वेडा
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।५।।

हळवे क्षण हळव्या मनाच्या कोंदणाला
सहज जाणे आसरा हा मनकवडा
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।६।।

राहती क्षण अभंग आणिक अभंग गाथा
नाही कधीही पडू मी देईन याला तडा
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।७।।

या घराने काय ना दिधले मला
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।
प्रेम माया अन् जिव्हाळा केवढा ।।

दि. २२/११/२१
दुपारी १२.२३ वा.

## (५३)
## सुहास्य माझे ठेवणीतले

जे जे आहे माझ्याजवळी
रेखीन सुंदर बघ रांगोळी
कशास कुढणे नाही त्यास्तव
लहर उमटू दे हास्य नितळी

नशिबी असतील काही पाने
काही फुले पण गळून गेली
झाडांखाली पडला पसारा
सुंदर नजरेतून वेचली

अंगण मातीचे जे साधे
साधे जगणे राहणी साधी
एक सकाळी मनात नक्षी
मनात रांगोळी येते आधी

चेहरा माझा टवटवीत हा
पाने फुले जणू गाली उमलती
ऋतू निसर्गा सोडून रोजची
माझ्या अंगावरती खेळती

काटे सुद्धा मिळती मजला
पायाखाली अंथरण्याला
बोचण्याच्या खुणा कशाला
उगाच आणू डोळा पाण्याला

डोळ्यामध्ये वाचून घ्यावे
जगणे माझे रांगोळीतले
रंग संगती जुळवून आणत
सुहास्य माझे ठेवणीतले

दि. १६/११/२१
सकाळी ०८.३२ वा.

## (५४)
## चित्त रमावे शृंगार दालनी

काय वाचू मी पुस्तक बंदी
समोर जीवन सुंदर छंदी
वाट मोकळी वळणावरची
अन हिरवाई सहज पसरली

पाठमोरी मी बसले जरीही
लावण्याची कोर चकोरी
स्वप्नं उमलतील कवळे कवळे
डोळ्यांमध्ये सोनसोनेरी

सूर्योदय झालेला आहे
सुस्नाता प्राचीवर लाली
मंद हास्य ते विलसत आहे
मीलन प्रियवर खुलते गाली

केश मोकळे वाऱ्यासंगे
सप्तसुरांचे रियाज करती
शब्द पुस्तकातील फिके हे
निसर्गात चैतन्या भरती

डोंगर सजले हिरवे शालू
वाट भांगातील केशर घोळू
सोनसळी उन्हं कांचन देती
सोनस्मृतींना सर्वांगी ल्येती

चित्र देखणे छबी मोहिनी
जीवन जगणे कला संगिनी
नाजूक ललना हृद्य कामिनी
चित्त रमावे शृंगार दालनी

दि. ०९/११/२१
सकाळी ०९.४७ वा.

## (५५)
## झोप सुखाची

अशी सुखाची झोप लागली
उघड्या जागेवरी
वर मोकळे छत आकाशी
खाली ना बिछाने तरी

मजूर राबतो मी कष्टाने
पडेल ते काम करी
पिकल्या मिरच्या पोचवणे मज
ढीग डोंगरापरी

कपडे माझे जरीही मळके
मन ना मळते कधी
घास दोन मी देऊ करतो
इतरा माझ्या आधी

धोतर माझा सदरा साधा
फेटा डोईवरी
निज लागते पटकन कधीही
अशीच मज भुईवरी

कधी कुणाचे न काही घेणे
मागितले ना काही
देत राहिलो माझे सारे
निवांत जगणे राही

पैसे मोजून गोळ्या खाऊन
पापणी ना मिटणारी
सुख कशात हो गरजा कमी या
आशा न कधी सुटणारी

या जोडीला तुम्हीही कधीतरी
असे पहुडणे अहा...
अंगा लागता गार हा वारा
थाट गर्मीचा पहा...

दि. २८/१०/२१
रात्री ०८.४२ वा.

## (५६)
## प्रीत उधाण उराशी

उधाणलेला सागर वेडा
आसुसलेला किनारा
धुंदीमध्ये उडती लाटा
तुफान पागल वारा

उडवीत जातो तो शिखरांना
झाडे कवेत घेतो
पवन कधीचे सूर कुणाचे
दबलेले जणु गातो

झाडेवेली झोकून देती
सुसाट वेगावरती
उंच शरीरे झुलता त्यांची
शहारलेली माती

हळूच जातो पाण्यावरती
लाटेशी हिंदळतो
वायू वादळ होता होता
सूं सूं करूनी खिदळतो

लाटही येते मस्तीमध्ये
तुफान वाऱ्यासंगे
आणि किनारा तिज सामावीत
जातो मागे मागे

चिंब होऊनी पुन्हा तियेला
अंगावरती घेतो
आज किनारा प्रियलाटेला
अगणित चुंबून घेतो

झुडुप कोवळे माना वळवून
मीलन साक्षी होती
एक अनामिक हिरवाई ते
पांघरून बघ घेती

भाण विसरूनी निसर्ग रमतो
जणू स्वर्ग दाराशी
कोण सुदैवी प्रियतम ठरतो
प्रीत उधाण उराशी

टिपून घ्यावे कुणी ओठांना
कुणी निसटत्या क्षणांना
कुणी टिपावे नयन मिटावे
हळव्या मस्त मनांना

दि. ०३/०९/२१
सायं. ०५.३७ वा.

**(५७)**

## तेजाची खाण हाती

अवकाश येई हाती
आकाश चांदण्यांचे
ही चंद्रकोर साजे
तारे हे काजव्यांचे

नीलांबरास घेऊन
करी या मुठीत माझ्या
ग्रहगोल तारकांच्या
भ्रमणास बदले त्यांच्या

होऊ न देई कधीही
अंधार अमावस्या
कोर वाढवाढुनी ही
पौर्णिमा ये सदाच

कर्तृत्व ऐसे घडवीन
आकाशाला गवसणी
मारून फेरफटका
कर चांदण्यांची वेचणी

तेजाची खाण हाती
अंधार नाही उरणे
मी कर्म केले ऐसे
कीर्ती जगाने स्मरणे

दि. ०३/०८/२१
सकाळी ०८.४९ वा.

## (५८)
## मातीमधल्या या खुणा

वाट माझ्या गावची मज
आणते खेचून अन्
क्षण किती ते सुंदराचे
देतेही वेचून अन्

बालपण गेले इथे मी
बागडलो किती मुक्त हा
शेत माती घर नि अंगण
काळ दिसे झणी गुप्त हा

पावलांच्या त्या खुणा
खुणगाठी हृदयी बांधल्या
आठवांच्या गाठोड्यातील
रम्य स्मृती ह्या चांगल्या

आज येतो मी इथे पण
हरवलेले माझेपण
ते निरागस हास्य आणिक
श्वास खुले ते ताजेपण

का किती दडपण उराशी
बांधुनी जणू आलो मी
धावपळीच्या जगण्यामध्ये
पुरता अडकून गेलो मी

हे खुले आकाश बोले
बोलते ही माती ही
सांगते मजला जुनी ती
घट्ट आमुची नातीही

नको ते धन सत्ताही फसवी
सच्चाई दे मज पुन्हा
येऊ दे मज सोबतीने
मातीमधल्या या खुणा

दि. ०८/०८/२०२२
रात्री ०८.०८ वा.

## (५९)
## खरे सुख

आज सार्थक जाहले
सुख अनुभवा आले
नातवंडं सेवा करी
डोळे माझे पाणावले

पाय धुवून घेतले
हात त्याचे चिमुकले
माझ्या चरणाशी बाळ
जिवाभावाने झुकले

सारी जिंदगी राबलो
कष्ट अमाप ते झाले
आज पुढच्या पिढीने
मला कृतकृत्य केले

काय पुण्य केले मीच
माझे पांग हे फिटले
एक गूढ कोडे माझ्या
आज मनात सुटले

आजा नातू जोडी बाळा
दृष्ट लागू नये कधी
माझं औक्ष लाभो तुला
सुख तुला मिळो आधी

थकलेल्या पावलांचा
गेला झटक्यात शीण
जगण्याला ये उभारी
माझं कोण तुझ्यावीण

देवा मागणं मागतो
मनाजोगं लाभो त्याला
दिलं सारं सारं काही
काही नको आता मला

दि. ०४/०८/२०२२
दुपारी १२.४१ वा.

## (६०)
## प्रवास

अशी एकदा एकटीच मी
निघून गेले प्रवासी
किती विचारही माझ्यासोबत
झाले सहप्रवासी

कोणी कुणाच्या संगे होते
कुणी कुणा ना सोडे
माझ्या सोबत एक स्मृतींचे
सुंदरसे गाठोडे

मग मी मिटले अलगद डोळे
तू शेजारी आला
वारा माझ्या बटा बटांतून
शोधत गंधा गेला

धावत गेले स्थानक सारे
अनोळखी ती गर्दी
ओळख माझी मलाच पटली
मनास देऊन वर्दी

वारूळ छेडून आठवणींचे
बुळबुळ जणू त्या मुंग्या
सरसर सरसर बाहेर पडुनी
माजवून दे दंग्या

आले वाटले भानावर मी
तू शेजारी दिसला
हरवून गेल्या तुझ्या सखीवर
गोड गाली रे हसला

पुन्हा एकदा हवा गारशी
गालावरती फिरली
क्षणात मीही आठवणींच्या
राज्यामध्ये विरली

दि. २९/०७/२०२२
रात्री ०९.५५ वा.

## (६१)
## आठवणींना फुटले पाय

जरा निवांत हे मन बसताना
आठवणींना फुटले पाय
कुठे आठवते काळही कुठला
हळूच बाजू सरते साय

कधी गोंगाटामधूनही त्या
स्मृती आपुल्या होऊन जाग्या
मलाच प्रश्न करिती सत्तर
ह्याचे काय न त्याचे काय
आठवणींना फुटले पाय

कधी झोप न येते राती
गोंधळ घालती उनाड स्मृती
यांना कसे हो सांगा सावरू
नाकेनऊ माझ्या येतात बाय
आठवणींना फुटले पाय

काळ वेळ न येण्याचा त्या
आठवणींना वेळ रिकामा
कधी कुणाचे प्रसंग पाहून
यांचा धुमाकूळ माजून जाय
आठवणींना फुटले पाय

किती असू दे व्यग्र मी तरी
येती येती दाटून फार
त्यांचा होतो आधारच मज
आठवाविना जीवन नाय
आठवणींना फुटले पाय

त्या चांगल्या की वांगल्या
कसे ठरवावे आपण आज
घडून गेल्या क्षणात निव्वळ
अडकून पडतो आपुला पाय
आठवणींना फुटले पाय

स्मृती खजाना महाकाय
आठवणींना फुटले पाय

दि. २५/०७/२०२२
सकाळी ०८.०३ वा.

## (६२)
## दोन धुक्यांनी ...

पावसाळ्यातल्या धुक्यानं
काचा सगळ्या वेढल्या ना
खिडकी स्वच्छ नितळ होती
दृष्टी धूसर घेरल्या ना

तुझ्या आठवांना तर
ऊत येतो अशातच
धुक्यातही भूतकाळ
स्पष्ट होतो अशातच

काच बाहेरची पुसता पुसता
आतून एक धुकं येतं
डोळ्यावाटे आभाळ होत
लोंढा वाहत मुकं होतं

उपनेत्राची काच मला
वारंवार पुसावी लागते
काहीच घडलं नाहीय आत
मी निर्विकार दिसावी लागते

तेव्हा बाहेरचं धुकं मग
आतल्या धुक्याला सावरतं
आतल्याचं दुःख पाहून
तेही वेडं बावरतं

आपल्याच धुंदीत होतं ना ते
एवढा वेळ ऐटीमध्ये
हरवलं म्हणे बाहेरचं धुकं
दिसेचना दिवटीमध्ये

आतल्या धुक्याचे हुंदके जरा
आता त्याला कळू आले
इतरांना पुसट करणे किती सोपे
स्वतः होताना रडू आले

पुन्हा माझ्या चष्म्यावर
त्याच्या आतून आभाळ झरलं
दोन धुक्यांनी दुःख माझं
पेलवत पेलवत हाती धरलं

दोन धुक्यांनी दुःख माझं
पेलवत पेलवत हाती धरलं

दि. २५/०७/२०२२
सकाळी ०७.४३ वा.

## (६३)
## परमेशाचे देणे सुंदर

ईश बोलतो ईश डोलतो
कळी फुलातून खेळ चालतो
वारा सांगून जातो काही
पातीवरती लेख लिहितो

फुलाफुलातील संदेशाचे
करण्या वाचन येती पाखरे
पायांवरती पत्र चिकटते
नवे बीजही मग अंकुरते

रंग वाहती ढंग वाहती
फुलपाखरे कौतुक पाहती
गुणवंताला जाण गुणांची
मधुमक्षिका मधी नाहती

गंध सुगंध नि परिमळ वाहून
वारा जातो गंधित होऊन
बीज लाभता या धरणीला
ऋतू फुलण्याचा येतो डवरून

स्वर्गामधले सूर रेशमी
सृष्टीमधुनी जाती रंगुनी
परमेशाचे देणे सुंदर
ज्याचे त्याला यावे कळुनी

दि. २२/०७/२०२२
सकाळी ०९.५८ वा.

## (६४)
## ऐक एवढे बोल मैत्रीचे

कधी वाटते आभाळाला
हळूच कानी पुसावे
का वाटते तुला भरावे
घनगंभीर दिसावे

कधी तुझे भरणे वेड्या
जिवास लागे हुरहुर
कधी माजवून देतोस रे तू
उरात धडधड काहूर

सागर वाफा कवटाळून तू
थेंब थेंब भरतोस
आणि भुईवर पोषण होऊन
कणी कणी उरतोस

कधी मेघ तव शुभ्र पांढरे
कधी काळे घनघोर
कधी मनातही येतो भरूनी
नभा तू भावविभोर

ऋतू असताना येणे समजते
नसता नंगानाच
वेळी अवेळी भरून गर्जन
त्रास रे सर्वांनाच

तुझ्या मनातही काही साठले
आहे का रे दुःख
म्हणून गाळीनमधून तू राजा
मूक गाळ तू तुझ्या वेदना
नको रे गाजावाजा

ऐक एवढे बोल मैत्रीचे
नितळ राहुनी हस तू
कधी पूर्णता कधी रिक्तता
कधी एकटा बस तू

दि. २२/०७/२०२२
सकाळी ०९.२२ वा.

## (६५)
## मन सुंदर तर विश्वची सुंदर

तू सावळीशी सुंदर कृष्णा
वाढविशी मज हृदयी तृष्णा
रंग रंगाचे सालस देणे
श्रीरंगाने सावळे होणे

जरी राधिका नितळशी गोरी
सावळ्याने तिज केली चोरी
रंगांचे ते रंग वेगळे
कुणा नशिबी रंग सोहळे

वरच्या रंगा खाली नितळसे
किती रंगांचे भरले कळसे
अणुरेणूंचे रंग कोणते
मन चित्ताचे रंग जाणते

अंतरंग हे जाणून घेता
आत्मरंगी तो ईश्वर कर्ता
तुज सौंदर्यामधे दिसे मज
तो विश्वाचा बघ निर्माता

स्वच्छ भावना सुंदर हास्य
अंतरातले मोहक लास्य
भाग्य उजळते शुभसंगिनी
रंग तुझा मज घाले मोहिनी

तेज चकाके तव भाळावर
आस लकाके मुखचंद्रावर
तुझे वागणे किती मधुर ग
असा भाळलो प्रिये तुझ्यावर

रंग प्रीतीचे लोभस सुंदर
रंग मदनी हे अजब कलंदर
तुझ्या रूपाचे शुभ्र चांदणे
मन सुंदर तर विश्वची सुंदर

दि. २०/०७/२०२२
रात्री १०.५५ वा.

## (६६)
## मुठीत काळाला धरलं

इरलं डोक्यावरी न चिंता
इरल्या वरच्या वरी
आज नभानं दान दिलंया
मोती धरणीवरी

बिगीबिगी उचला पाय सख्यांनो,
वाट चाललीया घरी
मनात झालं सपान हिरवं न
भिजलिया माती खरी

रुजंल रुजंल बियाणं इवलं,
अंकुर वटीत धरी
उजवंल कुस तिची उपजाऊ मायेची
पोसंल माय ती खरी

सरींच्या सरीत, डोगुर दरीत
ग्वाड लई त्याची नगरी
भरा भरा ग भरभर सुखाला
सांडून वाहू द्या घागरी

डोईवर इरलं गळ्यात डोरलं
दिसाचं तेज बी सरलं
उडून कसं हे जाईल पाखरू
मुठीत काळाला धरलं
आज म्या मुठीत काळाला धरलं

दि. १८/०७/२०२२
रात्री ०८.५८ वा.

## (६७)
## सुंदर असते मन रुपडे

रंग कोणता माणुसकीचा
माणूस काळा की गोरा
भूतमात्रावर जो मायेचा
अलगद घालतो बघ वारा

कुणा म्हणावे सभ्य चांगले
पोशाखावर स्तर न बरा
असू दे फाटका वरपांगी पण
देई जिव्हाळा तोच खरा

किती ओथंबून डोळ्यांमधुनी
वाहती स्नेहाच्या धारा
ज्याच्या हृदयी सहजपणाने
जीवास लाभे बघ थारा

कशास पहावे उजळ कातडे
सुंदर असते मन रुपडे
भाव मोलाचे आणि न काही
नश्वर इथले महाल गडे

शब्दवाचून स्पर्श बोलतो
देह आईचा अनुभवतो
मनात असता वात्सल्याच्या
सरिता पुरुषही माय होतो

नतमस्तक तो ईश्वर होतो
प्रेमासाठी तरसे जो
असे देखणे पाहून दृश्य
मंदिर आपुले विसरे तो

दि. ०१/०७/२०२२
रात्री ०८.०३ वा.

## (६८)
## सुख सांजवात

सुख निरागस,
सुख अनागस
सुख फुलागत,
सुख मुलागत

सुख फुकाचे,
सुख सुखाचे
सुख सहजीचे,
सुख सलगीचे

सुख हसण्याचे,
सुख रुसण्याचे
सुख असण्याचे,
सुख पुसण्याचे

सुख आनंदी,
सुख निज कंदी
सुख स्वच्छंदी,
सुखा न बंदी

सुख हाती हात,
सुख चांदणी रात
सुख गोडुली बात,
सुख सांजवात

दि. १३/०७/२०२२
रात्री ०९.३२ वा.

**(६९)**

**चाले आता शोध**
**माझाच कोण मी**

विसावा जीवा लाभला का कधीही
असे शोधता उमजतो नावधीहो

असे धावणे धावणे धावणे
दमवुनी स्वत:ला धन्यता पावणे

कधी मोकळा घेतला श्वास थोडा
आठवावे तरी आठवातून खोडा

पहावा तरी गाव ओसाड येथे
किती धावलो रुधिर घटवीत जेथे

निवांत न झालो कधीही मी जन्मी
चाले आता शोध माझाच कोण मी

दि. २९/०६/२०२२
दुपारी ०३.४७ वा.

## (७०)
## **मनातून उमटून येती तराणे**

उगा थांबणे काठी थोडे निवांत
जळातील लाटा भासताती प्रशांत

असे कोवळे ऊन अंगास लाभे
ही इकडे ऊब तिकडे शीतलता जागे

असे पाहुनी दृश्य गोजिरवाणे
मनातून उमटून येती तराणे

कधी आपुली सावली पाहताना
मना वाटते बिंब माझे हवे ना

मनाची कधी छाया गावेल जर का
माया मनाची मूर्त होईल बरं का

क्षणाची तरी मिळविण्याला उसंत करावे
कधी अंत:करणा पसंत

झुलावे झुले अंबरी हिंदोळ्यांनी
हसावे हळू गाली कोमल कळ्यांनी

नको कसल्या चिंता नि त्या काळज्या
ही
उडू द्याव्या आकाशी मनभावनाही

दि. २९/०६/२०२२
दुपारी ०३.१८ वा.

## (७१)

## प्रेम लाभताच स्वर्ग

सुंदराचे रूप देवा
देवरूप होत जाई
नंदादीप सांजवेळी
सांजवेळी भक्त गाई

गाय गोठ्यात परते
परते ती वासराला
जाय चाटत मायेने
माया ओसरे डोळ्याला

कणकण भरलेला
भरलेला कोना कोना
माय मायेची ती खाण
खाण भाग्याचीच हो ना

लेकरात तिचा जीव
जीव वात्सल्य भरला
तिचे किती उपकार
उपकारे पुरलेला

नाही नातीगोती काही
काहीजण सांधलेले
रक्तसंबंध नसता
नसताच बांधलेले

जिवाभावाचं हे कोणी
कोणी येताच जीवनी
मन वसंतात जाई
जाई जुई खुले मनी

प्रेम जगण्यात आलं
आलं संजीवन झालं
नवं अंकुर फुटून
फुटूनिया वाढलेलं

प्रेम आधार भक्तीचा
भक्तीचा नि वात्सल्याचा
हृदयात खुललेल्या
खुललेल्या वसंताचा

प्रेम जिव्हाळा नि माया
माया आपुलकी झेला
प्रेम धागा विणलेला
विणलेला रम्य शेला

प्रेम लाभताच स्वर्ग
स्वर्ग जणू लाभलेला
भुईवर प्रेमवृक्ष
प्रेमवृक्ष वाढलेला

असो कोणतेही नाते
ना ते नाते ठरलेले
प्रेम ओलावा असू दे
असू दे ते भारलेले

दि. २२/०६/२०२२
सकाळी ०७.१६ वा.

## (७२)
## वसा कुंभाराचा घ्यावा

अंग मातीनं माखलं
जिणं मातीनं सांधलं
देता मातीला आकार
जग मातीचंच झालं

जिला माय म्हणायची
तिची सेवा घडलेली
नाती मातीशीच कशी
जलमाची जडलेली

एक एक घडा येई
जवा आकार त्यो घेई
हात मायेचा फिरता
बाप कुंभार ह्यो होई

घालमेल माऊलीची
जीवाजतन करता
कच्च्या मातीच्या गोळ्यात
पक्कं अवसान भरता

मऊ हात माऊलीचा
बाप धपाटा घालतो
संसाराचा गाडा बाबा
पळत्या चाकानं चालतो

घडवणं हाती जरी
न्हाय नशीब हातात
घट घडतो कोणता
मडकं फुटं स्मशानात

शुभ सुख झेलं कुणी
कुणी आसवात बुडं
देवापायी कुणी पुजं
कुणा नशिबी झोपडं

कुणी पाणपोई व्हतं
ऱ्हाई तहान भागवीत
कुणी चुलीवर चढं
भूक भुकेची शमवीत

घडणं मिटणं चालतं
जगणं मरणं ना ठावं
कर्म करावं इसरावं
दान कुंभाराचं घ्यावं

देह घट जाण बाबा
वरी कुंभार राहतो
जीव वतून त्यो एक
एका जिवा पाठवतो

पाच तत्त्व मिसळले
पाच प्राण ते वतले
घट फुटता शेवटी
सारे मातीत मिळते

घडवणं ना सोडावं
बिघडतं म्हणू नये
लय व्हणारंच त्याचा
म्हणून काम सांडू नये

वसा कुंभाराचा घ्यावा
घट घट घडवावा
आवा आनंद लुटावा
जीव जिवा जडवावा

दि. ०७/०६/२०२२
रात्री ०८.१३ वा.

## (७३)
## मृद्गंध मोहवी मना

मृद्गंध दरवळे जेव्हा
मज ओढ वेगळी वाटे
का उगाच मातीसंगे
जडे एक अनामिक नाते

ते थेंब मृगाचे पडता
अत्तर कुपी मृण्मयी उघडे
तो दिव्य सुगंध पसरता
वाजती सुरभी चौघडे

मृद्गंध मोहवी मना
मन धुंद होऊनी जाते
ओलावा प्रीतीने भरला
ते गीत तयाचे गाते

स्मृती मनी दाटुनी
मज मनी पावसाळा ये
त्या तुझ्या नि माझ्या भेटी
पावसास चाळा लागे

मृद्गंध खूण परिमळते
मी क्षणात हरवून जाते
ते वातावरण प्रफुल्लित
मृद्गंधी मी हरखून जाते

मृद्गंध जणू सुरुवात
नव नात्यांची रुजवात
मृद्गंध हुंगताना तो
ऋतू गाभूळलेला आत

दि. २८/०५/२०२२
सकाळी ०८.४९ वा.

## (७४)
## वसा जांभळा मी घ्यावा

छटा जांभळी जांभळी
रंग जामुनी गाभूळी
गुच्छ पुष्पांचे हासले
उमलून कळी कळी

मनी वाटते असे की
साडी सुंदर नेसावी
रंग जांभळा दिसावा
फुले त्यावरी असावी

काय किमया ती त्याची
रंग कोठून आणतो
माती भुरी काळी परि
रंग सारेच जाणतो

कधी वाटे हेवा साऱ्या
रंग मोहिनीचा जरा
किती विविधता त्यांची
किती छटा त्या सुंदरा

केशकुंतलात कधी
रंग जांभळा खुलावा
फुले माळताच सखा
पुन्हा पुन्हा की भाळावा

प्रीत जांभळी फुलावी
बाग जांभळी उमलावी
उमलत्या भावनांनी
साद जांभळीच द्यावी

स्वप्नं माझे हो जांभळे
जांभळाच श्याम व्हावा
राधा ल्येत जांभळाई
वसा जांभळा मी घ्यावा

दि. २५/०५/२०२२
सायं. ०४.५४ वा.

## (७५)
## वाटा एकल्या चालाव्या

वाट पाल्यापाचोळ्याची,
रानी एकटी एकटी
तिने अंगी माखलेली,
भुरी मातकट उटी

तिला पाहण्यास येई,
कोणी कधी विरळाच
येई उधळीत वारा,
फुपाटा नि धुरळाच

झाडं वेली गाळतात,
अश्रू जणु सुकी पानं
अनोळखी पक्षी गाती,
तिच्या विरहाचं गाणं

नाही धामधूम कधी,
नाही कसली वर्दळ
तिच्या कणाकणातून,
सुटे मातीचा दरवळ

तिच्या अबोल भावना,
कशा कुणाला सांगाव्या
एकटीचं जिणं तिचं,
वाटा एकल्या चालाव्या

दि.२५/०५/२०२२
सकाळी ०६.५७ वा.

## (७६)
## या कमानीची
## खुमारी आठवावी

या कमानीला तुम्हाला भेट देणे
एक वेडे सौख्य पायी लांघवीणे
तोरणे बांधून झाडे वाकलेली
सावलीच्या सोहळ्याला साक्ष देणे

ते उन्हाळे संपती ना तप्त ज्वाळा
वाहनांच्या शर्थ होती धावण्याला
एक थोडा भाग ऐसा झाकलेला
कंच पाचू रंग त्याते माखलेला

चाळण्या की गाळण्या त्या आतपाच्या
थंड वाऱ्या धुंद साऱ्या हुंगण्याच्या
पाखडावे ऊन सारे या सुपाने
आणि धान्ये चांदण्याचे घेत जाणे

वाटते की मार्ग हा ना संपणारा
हा ठरावा जीवनाला सांगणारा
भोगिले जे दुःख ते ते सोड मागे
या कमानीला न काही तोड राजा

वाटते येथेच यात्रा गोठवावी
देखण्या रस्त्यात चित्ते पाठवावी
चालणे ते चालणे ना थांबताना
या कमानीची खुमारी आठवावी

दि. २४/०५/२०२२
सकाळी ०८.०९ वा.

## (७७)
## साधना ही पंचप्राणा जागवीण्या

का उगा ही खंत वाहे जीवनाची
थेंबथेंबा मेळवीण्या कष्ट वेची
आस ठेवी वाहणारी आत थोडी
चाखण्याला लाभते ही गोडगोडी

माणसाचे कर्म ऐसे घातकी हे
नीरसाठे संपविले स्वार्थ पाहे
भूजलाच्या पातळीच्या खोल खोली
खोद खोदूनी तयाला शोषलेली

प्राज्ञ आम्ही ज्ञान आम्हा केवढे हे
स्त्रोत पाहे बुद्धीचे हे आटलेले
आटलेल्या ह्या झऱ्याला जीव लाभो
सांधुनीया घेऊ धागे फाटलेले

बिंदूबिंदूची नवाळी होय गोळा
थेंबथेंबी पाहुनीया कृष्ण काळा
ऊतणे ना मातणे व्हावे जरासे
साधना ही पंचप्राणा जागवीण्या

पंचभुते देह होई बांधलेला
शर्थ व्हावी आणि देहा वाचवीण्या
तत्त्व कोणी कोणते हे जाणियेले
शेवटीही घोट लागे प्राण जाण्या

ही महीमा रे जळाची ओळखावी
जीवनाची जी उपाधी तू पहावी
वाचवावे थेंब पाण्याचे क्षणाला
ही धराही प्रीतवर्षावी नहावी

दि. २२/०५/२०२२
सकाळी ०७.४४ वा.

## (७८)
## नवी खुमारी नव्या नव्याने

शुभप्रभाती शुभ आरंभी
शंख फुंकूनी नव्या दमाचा
नव्या चेतना देत उगवतो
नव्या पहाटी हर्ता तमाचा

तो आला की काळोख संपे
रातकिड्यांची किरकिर दमते
लुप्त चांदण्या चमकून थकल्या
प्राचीवरती उषाली रमते

धमन्यांमधले रक्त उसळते
गगनराणी तेजास घुसळते
रंग आशेचे उषेत अलगद
सकाळ रमणी अशी मिसळते

नयन उघडता स्वप्न संपते
दिवसाढवळ्या कर्म सांगते
पुढे चालणे गड्या तुला रे
दिवस एक चेतना रांधते

युद्ध आपुले आपुल्यासंगे
दमायचे ना दिनमणी सांगे
काळ चालला पुढे पुढे तो
जीवनांगणी नकळत रांगे

रोज फुंकू या शंख नव्याने
नव्या जिगीषा पंख नव्याने
नवी भरारी नवी उभारी
नवी खुमारी नव्या नव्याने

दि. ०७/०५/२०२२
दुपारी ०२.४४ वा.

## (७९)
## सुंदर जगणे असे घडावे

जिद्द कशाला ऐशीतैशी
जीव घेतला तरी उराशी
जगण्याची आशा न संपावी
गर्भातुनी कोंबांच्या राशी

कठीण किती जरी गुदरे प्रसंग
रडणे नाही मना न खंग
अतुल्य जिद्दीपुढे वाकवून
निसर्गासही करणे दंग

किती तलवारी आणि कुऱ्हाडी
जरी कोसळल्या पडल्या धाडी
अंगामधल्या धमन्या सळसळो
उगवून येवो पुन्हा धडाडी

चिवट जिद्द ना सोडती झाडे
कधी भुई तर कधी पहाडे
थेंबही जिथे जळ ना मिळते
तरी कुठूनसा अंकुर वाढे

जगायचे तर असे जगावे
मरणालाही कोडे पडावे
मी का आलो उगाच येथे
सुंदर जगणे असे घडावे

दि. ०५/०५/२०२२
रात्री ११.३३ वा.

## (८०)
## याच सुखाच्या मोहक व्याख्या

एक पुष्प प्राचीवर खुलता
धरातली उमलली ही सुमने
ती सारी कलिकांची हास्ये
लेऊन सजली रेशीम लेणे

एक तेज प्रगटले अंबरी
एक तेज डुलले भूवरी
रोज चालतो खेळ खेळकर
पुष्पांसाठी वेडा दिनकर

टवटवीत चैतन्ये दिसती
वृक्षवेली फुलती अन् फळती
प्रकाश पसरून दिशा उजळता
आयुष्याच्या उजळती वाती

कुणास पहावे इतुके सुंदर
नक्षी फुलांची ही धरणीवर
नक्षत्रांनी मिटून स्वतः
नभी बांधले सविता झुंबर

याच सुखाच्या मोहक व्याख्या
अन आनंदाच्या परिभाषा
जपून ठेवा क्षणक्षण मौलिक
जतन करावी हृदयमंजूषा

दि. ०४/०५/२०२२
सकाळी ०७.२४ वा.

## (८१)
## मनास रमू दे ग्रंथांमध्ये

ग्रंथ संपदा इतुकी प्रभावी की
शस्त्र तिथे बघ मान टाकते
सद्विचार ज्ञानापुढती हो
दुष्प्रवृत्ती अलगद झुकते

ग्रंथालये ही ज्ञानमंदिरे
जडणघडणीची हो गोपुरे
सुयोग्य वेळी हाती पुस्तक
चिंता कसलीच मग ना उरे

जन्मजात ना कुणी असुर
परिस्थितीचा मुखडा भेसूर
जशी संगती आणि विचार
तसाच प्रकटित हो आचार

मित्र पुस्तके जर का झाली
मनात गंगा झुळझुळलेली
पावित्र्याच्या वातावरणी
ज्ञानसरिता खळखळलेली

मनास रमू दे ग्रंथांमध्ये
पुस्तक सोबती सदा राहू दे
शब्दांची सुंदर शिल्पे जी
स्वप्नील होताना पाहू दे

दि. ०२/०५/२०२२
सायं. ०५.२५ वा.

## (८२)
## जात राहणे जीवन

थांबलो ना मी कधी
थांबेल ना कधी जीवनी
त्या विधात्याची ही मर्जी
म्हणून स्वीकारील मनी

काय घडते काय नाही
कोण जाणू पाहतो
सहज नाही उमगणे ते
योजना विधी रेखतो

कर्म केवळ हाती आपुल्या
चांगले करणे भले
वाकड्या रस्त्यास जाणे
ना कधीही चांगले

दारी आले दुःख जरीही
मी उदास ना होईन
त्यापुढे सुख येत राहील
मी न ढळुनी जाईन

का उगा मी थांबणे मग
चालणे मनभावन
त्याच्या आलेखावरून नित
जात राहणे जीवन

दि. २८/०४/२०२२
सकाळी ०८.४३ वा.

## (८३)
## विधात्याची जणू आस असे

या सुखाला काय म्हणू मी
अन्नचारा उगवला
पहावे तिकडे ताज्या ताज्या
गवतराजी उमलल्या

फुलली राणी सृष्टी सारी
हिरवी स्वप्ने पहुडली
नयनसुख हे पाहून सुंदर
किमया वेगळी अशी घडली

ते पाण्याचे पाट वाहती
डोंगरावरून धरणीवर
धुके पसरूनी गेले वरती
नभांगणाच्या सरणीवर

असे वाटते पक्वान्ने मज
साठी येथे मांडियले
निसर्गराजा किती उदार तू
जिवामुखी घास धाडीयले

नको काळजी उगा उद्याची
खरेच जगणे आज असे
हिरव्या रंगामधुन डोलती
विधात्याची जणू आस असे

दि. २६/०४/२०२२
रात्री ०९.३३ वा.

## (८४)
## ‘आई’ शब्द हे

हृदयाशी तू धरले मजला
अन् हृदयातून भरले ग
जन्म लाभता ‘आई’ शब्द हे
आपसुक ओठी स्फुरले ग ।।धृ.।।

स्पंदनांसवे तुझ्या मी जगतो
गर्भामध्ये असताना
रुधिर देऊनी तू पोशियले
शून्य असा मी असताना

वजा तुझ्यातून होताना मी
काही माझे बघ नुरले ग
जन्म लाभता ‘आई’ शब्द हे
आपसुक ओठी स्फुरले ग ।।१।।

रूप ईश्वरी असते जननी
सोशियले तू कष्ट किती
देत राहते तरी तुझी ना
ओंजळ ठरते कधी रिती

वात्सल्याचे भाव मनातून
सदैव माझ्या मुरले ग
जन्म लाभता ‘आई’ शब्द हे
आपसुक ओठी स्फुरले ग ।।२।।

चिंतन माझे क्षणाक्षणाला
अंत:करणी करिशी तू
अखंड माया झरा होऊनी
अविरत जीवनी वाहशी तू

पापकर्माचे जाळे माझे
तुझ्यामुळे बघ विरले ग
जन्म लाभता ‘आई’ शब्द हे
आपसुक ओठी स्फुरले ग ।।३।।

दि. २५/०४/२०२२
सकाळी ६.५७ वा.

## (८५)
## मग नवीनतम मंजूषा

कंगाल जरी असा दिसलो
तरी आत चैतन्य आहे
आज मी हिरवा नसलो
तरी आत हिरवाई वाहे

वाऱ्याशी देऊन झुंज
कधी सळसळणारी पाने
ते गुज आमुचे आम्हा
माहीत होताना गाणे

बहरास झेलले कितीदा
कितीदातरी शिशिर खेळला
बागडले ऋतू सहाही
प्रत्येक आगळा सोहळा

नसणे गरजेचे असते
असणे नसण्याची खूण
नसलेपण असते म्हणुनी
असण्याचे भाव अजून

जगण्याचे तत्त्व हे साधे
जरा रिक्त होऊनी जावे
नसतील सूर मदतीला
तरी अबोल गाणे गावे

आतून वाहता आशा
नसतेच कधी हो निराशा
थोडीशी करूनी प्रतीक्षा
मग नवीनतम मंजूषा

ती जगण्याची मग भाषा
फुलण्याची फुलावी मनीषा
काळोख संपवून येईल
येईल नवी प्रत्यूषा

दि. १७/०४/२०२२
रात्री ०९.३१ वा.

## (८६)
## नाते कोणते कोणत्या खुणा

उगाच स्मरते घर ते आपुले
अंगणातली उभी नारळी
मातीमधले स्पर्श मुलायम
फांदीवरली अबोलशी कळी

आकाशाशी नाते जडवीत
उंच उंच नारळी वाढली
जमिनीतले निर्मळ जळ ते
पोटामध्ये दडवून गेली

पावसातले तळे साठले
त्यात बुडविले बाल्य आठवले
तारुण्यातील सहवासाचे
क्षण सुगंधी अन् भिजलेले

गाव सोडता आईच्या मज
मनातली ती गलबल बोले
अश्रू तेव्हा तिचे मायेने
ह्याच अंगणी बघ ओसरले

सुखदुःखाच्या खुणा उराशी
सांभाळून हे अंगण गप्प
कधी वाटते घर किलबिलले
आज माणसाविन का ठप्प

आई माझी अंगणातल्या
ओसरीवरी दिसते मजला
तुळशी वृंदावनी तेवती
सांजवात खुणविते का मला

मन धावते पुन्हा पुन्हा अन्
देह तळमळे गावी जाण्या
खोल रुजलेले ते अनुबंध
नाते कोणते कोणत्या खुणा

दि. १७/०४/२०२२
सकाळी १०.११ वा.

## (८७)
## लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

लळा जिव्हाळा स्पर्श बोलती
जिवा जीवांची नाती जुळती
शब्द नसले तरी डोळे वाचून
मूकपणे बघ भावही कळती
लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

माणूसपण हे माणुसकीचे
कातडीवरल्या ना रंगाचे
वरपांगी ना टिकते काही
खोल मनातुन भाव डोलती
लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

आईपण मग मिळो कुणाला
हृदय आईचे प्रत्येकाला
वात्सलता त्या तिथे पाझरे
पाषाणही जळ स्रवू लागती
लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

कपिशावक ते बिलगून गेले
वृद्ध मनाला कोंबची फुटले
माया कळली दोन जीवांना
आपसुक डोळा अश्रू गळती
लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

दि. १०/०४/२०२२
रात्री ११.५७ वा.

## (८८)
## एवढाच मज वर दे

कोणकोणत्या रंगफुलांचा
हट्ट मी देवा करावा
तू जे सारे देतो निर्मून
कृतज्ञ भाव धरावा

इथे लगडले झाड फुलांनी
वाटे मी स्वप्नात
धुके पसरले सभोवताली
लावण्यही कणाकणात

रंग गुलाबी धवल केशरी
हिरवा पिवळा पसरे
क्षणात सारे दुःख कोंडले
मन हे माझे विसरे

केवळ पाहून स्पर्श जाणवे
कोमलतम रेशमी
कुठून आणीशी विविधता तू
कसे न पडते कमी

जन्म आवडता जर का देशील
सुमन सुमनी मज कर रे
खुलून येईन फुलून जाईन
आस एवढी भर रे
देवा, एवढाच मज वर दे

दि. ०१/०६/२०२३
सकाळी ०७.४७ वा.

## (८९)
## तो काळ ठप्प झाला

आलास का उन्हा रे
मज अंगणी पुन्हा रे
सोनेरी तेज घेऊन
भेटावया कुणा रे

तरुवल्ली चाळणीतून
देहास चाळूनीया
येतोस किती सहजी
आभेस माळूनीया

ते स्पर्श अळुमाळू
हृदयात थांबतात
घर अंगणात रमल्या
बाल्यास आणतात

ती रोजचीच भेट
जी व्हायचीच थेट
काही मनातले मी
सांगूनिया निमूट

आता जे ऊन येते
मन पोळूनी हे जाते
ते गाव माणसे ती
घर मागे मागे रहाते

पाहतो तुला जरी मी
कोठुनिया दुरूनी
ते कोवळे खुलासे
हृदयांतरी उरूनी

आता न बोलतो तू
का गप्प गप्प झाला
होती सकाळ सुंदर
तो काळ ठप्प झाला
तो काळ ठप्प झाला...

दि. ०२/०६/२०२३
सकाळी ०८.५३ वा.

## (९०)
## नवी वादळे

रोज येती ही नवी वादळे
नवी आव्हाने पेलायाला
रोज नव्याने मीही सज्जच
नवी संकटे झेलायाला

येऊ दे अशा कितीही विपदा
अंगी बळ मी बाळगणे
असता माझ्यामधे संपदा
कशास गात्रा त्या गाळणे

घोंगावणाऱ्या लाटा असू दे
असू दे उफाळणारे काही
तमा कशाची नाही मजला
आत सळसळे रक्त प्रवाही

कुणी आडवे आले जर का
करीन नामोहरम त्याला
असा करून मी प्रहार येईन
विसरे कधीही ना तो घाला

आत समुंदर जो धैर्याचा
शूर वीरता बाणतसे
माझ्यासाठी मीच नव्याने
खेचून यशश्री आणतसे

दि. ११/०६/२०२३
दुपारी १२.४४ वा.

## (९१)
## माझ्या कवितेची गोडी

शब्दा फुटूनिया पान्हा
मन होय माझे कान्हा
वात्सल्याची ऊब देते
कवितेचा मी हो तान्हा

डोंगराला जो फुटतो
तसा पाझर आतून
वर भाव गंभीर ते
रस ओलावा ओतून

धारधार अर्थ देते
कधी लोण्याहून मऊ
इहपरलोकाचेही
सुख देती रस नऊ

सृष्टी सारी सामावते
माझ्या कवितेच्या गावी
रोज नव्या रूपातली
सर्जनाची नवलाई

आता नको देवा काही
एक तिची माझी जोडी
जीवा लागली अतूट
माझ्या कवितेची गोडी

दि. १३/०६/२०२३
सायं. ०६.५३ वा.

## (९२)
## अहा बाहेरी ती वनराई

गाव इवलेसे घर ती झोपडी
साधी साधी सरळ बापडी
साध्या वाटा साधी माणसे
माणुसकी ही इथे सापडी

हिरव्या हिरव्या हिरवाईच्या
थंड झुळुकाही झोके घेती
वाऱ्यावरती सरळपणाच्या
कथा कोवळ्या वाहत येती

कुणी बांधले मंडपी पाचू
सुख डोळ्यांना ताजे वाटे
एक वेगळी शांती इथल्या
कणाकणातून निश्चित भेटे

तुडवून गेलो तरी न सुटते
माती पाया घट्ट बिलगते
दुःख कोणते कसल्या वेदना
अलगद सारे सहजी विलगते

आत कुटीच्या जग ते सुंदर
लावण्याची रंगवू चित्रे
अहा बाहेरी ती वनराई
भारून जाती सारी गात्रे

दि. १५/०६/२०२३
रात्री १०.३७ वा.

## (९३)
## त्याचे रूप आठवावे

या डोलत्या तुऱ्यांना
पुसणे कसे रहाणे
येवो झुळूक अथवा
वादळ डुलत रहाणे

विश्वास निजपणावर
ठेवून मुळे घट्ट
काहीही असो संकट
ताठ रहावे की घट्ट

रोज मावळती देख
किट्ट अंधारात निजे
पुन्हा प्रकाशाची दारे
पहाटेला सूर गाजे

जरी शिशिर उगवे
वसंताची घे चाहूल
नको मागे मागे आता
उचलले जे पाऊल

आत रस जगवून
ठेवू मनाला जिवंत
मग आशा रोज जागे
एक श्रद्धा ही ज्वलंत

डोल डोलून हसावे
आत पहात बसावे
एक मन एक चित्त
त्याचे रूप आठवावे
त्याचे रूप आठवावे...

दि. १७/०६/२०२३
रात्री ११.२३ वा.

## (९४)
## भरल्या आभाळाची व्यथा

भरल्या आभाळाची व्यथा
कशी कुणाला कळावी
कोसळून रुजवावं
तेव्हा धरणी फळावी

किती दूरचा प्रवास
वारे पिटाळून देती
आत दाबल्या जळाची
दुःखे उफाळून येती

ठरविलेल्या मुक्कामी
कसे जायचे न माहीत
वादळांच्या वाटा गोल
परतीच्या दिशा नाहीत

कधी टेकावे वाटले
टेकडीवर सहजी
हाती विश्रांतीही नाही
सदा पळत राहजी

बरे वर्षाव करून
रिक्त होऊन रहावे
परि रिकाम्या ढगाला
कोणी कोणीही न पहावे

भरल्यातल्या वेदना
रिकाम्यातल्या बोचण्या
भाले विजेचे घुसता
जिव्हारी खुपे टोचण्या

दि. २४/०६/२०२३
रात्री ११.३४ वा.

## (९५)
## ती धनिक खरी सुंदरी

चिखलात डुंबली काया
मातीचा अत्तर फाया
हातात धान धन जैसे
ही मृद्गंधा खुश बाया

सरी कोसळल्या कोसळल्या
मऊशार माऊली माती
तिज उदरी केवढी माया
जणू माय लेकरं नाती

तो चिखल नव्हेची चिखल
उटी गंधित लेपून देही
ही अन्नपूर्णा दिसते की
रूप लक्ष्मी देखून घे ही

साळीची रोपे कवळी
रुजवत हाते आपुल्या
सांभाळून निजसंताना
ही पोषण करते सकला

जशी उमलून येते कमलिनी
पंकातून तरारणारी
ही तशीच सुंदर बाला
शेतातून विहारणारी

ते तिचे खुलविती रूप
भूषणे जणु मातीची
ती धनिक खरी सुंदरी
तेजाळी ज्योत वातीची

दि. ०२/०७/२०२३
सकाळी ०९.२२ वा.

## (९६)
## मनास उंचावरून झोकता

धबधब धबधब पडे धबधबा
कोसळताना दुःख ना मना
सौंदर्याची करूनी पखरण
जितके जीवन झोकून दे ना

येईल वर्षा सरी बरसतील
वेगे त्यांच्या आवेगाने
कुठे सांडले चित्त भाळुनी
पहा कुणावर त्या मेघाने

कुठे साठले पाणी आपसुक
वाहून जाण्या होई उतावीळ
कुठे झिरपुनी झऱ्याझऱ्यातून
छेडीत तारा मनास मोहील

हिरवाईने वस्त्र देखणे
शुभ्र शटिका जणू पांघरणे
शेला तियेचा लांब लोळतो
डोंगरातुनी तिने वाकणे

फिटे पारणे या जन्माचे
क्षणभर मनात भरून घेता
होत धबधबा कोसळू पहा
मनास उंचावरून झोकता
मनास उंचावरून झोकता

दि. १२/०७/२०२३
सकाळी ०८.२३ वा.

## लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित "वैदिक साहित्याचा इतिहास" (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्यायः, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय (जीवनपर कविता), यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (वेळा) - तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (जीवनपर) - मंजुभारती, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com//lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री – डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ७१
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ३२
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •